cmyk

## संपादकीय

### वाटचाल विनाशाकडे...

जागतिक तापमानात झालेली वाढ गंभीर स्थितीत पोहोचली असल्याचे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना मान्य नसेलही; परंतु ते वास्तव आहे, हे जगाने मान्य केले आहे. वनसंपदेवर मनमानी पद्धतीने कुऱ्हाड चालवून निसर्गचक्राचे ताळतंत्र त्याने बिघडवले आहे आणि त्याचा अनुभव आपल्याला वेळोवेळी येत आहे. झारखंड, मध्य प्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओडिशा आणि छत्तीसगड यांसारख्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वनतोड झाली आहे. शेतजमिनी वाढवण्यासाठी, रस्ते, धरणे, औद्योगिक क्षेत्रे, महानगरांचे विस्तार, कोळसा, लोह, बॉक्साइट यांसाठी मोठ्या प्रमाणात जंगलाचा नाश केला जात आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyalokatantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### निवडून आलेल्या ५ विधानपरिषद सदस्यांनी घेतली शपथ

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेवर बिनविरोध निवडून गेलेल्या महायुतीच्या पाचही सदस्यांनी शुक्रवारी (दि.२१) सभागृहाचे सदस्य म्हणून शपथ घेतली. याबद्दलची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवरून दिली आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीच्या एकूण पाच नेत्यांचा शुक्रवारी शपथविधी पार पडला. यामध्ये भाजपचे दादाराव केचे, संजय केणेकर, संदीप जोशी, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे संजय खोडके तर शिंदेंच्या शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी यांचा शपथविधी विधानपरिषद सभागृहात झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांची सभागृहाला ओळख करून दिली. विधान परिषदेची पोटनिवडणूक बिनविरोध झाली.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–३२७ शनिवार, दि.२२ मार्च २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये

# मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांना पीकविम्याचा अग्रिम मंजूर

## नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ७०५ कोटींची भरपाई

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात यंदा चार जिल्ह्यांमध्ये २५ टक्के अग्रीम भरपाई देण्यासाठी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी अधिसूचना काढल्या होत्या. त्यापैकी एका जिल्ह्यात कंपनीने अधिसूचना फेटाळत अग्रिम भरपाई देण्यास नकार दिला. तर तीन जिल्ह्यांमध्ये अग्रिम भरपाई मिळणार आहे. हे तीन जिल्हे म्हणजे नांदेड, परभणी आणि हिंगोली. या तीन जिल्ह्यांमधील १८ लाख ८४ हजार शेतकऱ्यांना ७०५ कोटी रुपयांची अग्रिम भरपाई मिळणार आहे.**

तीन जिल्ह्यांमध्ये अग्रिम भरपाई देण्यासाठी कंपन्या तयार झाल्या आहेत. परभणी जिल्ह्यात सर्वाधिक २९६ कोटी ८८ लाख रुपयांची अग्रिम भरपाई शेतकऱ्यांना मिळणार आहे. तर नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २५४ कोटी ५९ लाख रुपये अग्रीम भरपाई मंजूर करण्यात आली. तसेच हिंगोली जिल्ह्यातील शेकऱ्यांना १५४ कोटी ३६ लाख रुपये अग्रीम भरपाई मंजूर करण्यात आली. असे तीन जिल्ह्यांमध्ये एकूण ७०५ कोटी ८४ लाख रुपये भरपाई मिळणार आहे. तर १८ लाख ८४ हजार शेतकऱ्यांना ही भरपाई मिळणार आहे. राज्य सरकार आपला हिस्सा दोन दिवसांमध्ये देणार, असे कृषी विभागाने स्पष्ट केले. त्यामुळे शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या बाबीअंतर्गत भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. यंदा ४ जिल्ह्यांमध्ये अग्रिम भरपाई देण्याच्या अधिसूचना जिल्हाधिकाऱ्यांनी काढल्या होत्या. यात यवतमाळ, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांचा समावेश आहे. यापैकी यवतमाळ जिल्ह्यात २५ टक्के अग्रिम भरपाई देण्यास कंपनीने नकार दिला म्हणजेच अधिसूचना फेटाळली. तर नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अग्रिम भरपाई मिळणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील अग्रीम ◀◀ पान २ वर



### राज्य सरकारने हिस्सा दिल्यानंतर खात्यात जमा

राज्य सरकारने आपल्या हिस्स्याचा पहिला हप्ता विमा कंपन्यांना दिला नाही. त्यामुळे नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अग्रीम भरपाई मिळाली नाही. पण राज्य सरकार दोन दिवसात आपला ७०० कोटींचा पहिला हप्ता विमा कंपन्यांना देईल, असे कृषी विभागाने सांगितले आहे. राज्य सरकारने हप्ता दिल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात विमा भरपाई जमा होईल.

# कर्नाटक विधानसभेत मुस्लिम आरक्षण विधेयक मंजूर

## मोठा गदारोळ, भाजपचे १८ आमदार सहा महिन्यांसाठी निलंबित




बंगळूरू। वृत्तसंस्था

मुस्लिम आरक्षणाच्या मुद्यावरून कर्नाटक विधानसभेत प्रचंड गोंधळ पाहायला मिळाला. कर्नाटक **सरकारकडून सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देण्याची घोषणा करण्यात आली आहे. यासंदर्भातील विधेयकाला मंजूरी मिळाली आहे. मात्र, भाजप आमदारांकडून या विधेयकाला जोरदार विरोध करण्यात आला.**

विरोध करताना आमदारांकडून विधेयकाच्या प्रती देखील विधानसभेच्या अध्यक्षांवर भिरकावण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. भाजप आमदारांनी विधेयकाला विरोध करताना गोंधळ घातल्याने विधानसभा अध्यक्ष यूटी खदार यांनी मार्शल बोलावून या आमदारांना सदनातून बाहेर काढले. विधानसभा अध्यक्षांनी कारवाई करत भाजपच्या ◀◀ पान २ वर

### प्रचंड गदारोळात विधेयकाला मंजूरी

मुस्लीमांना सरकारी कंत्राटात चार टक्के आरक्षण देण्याच्या या विधेयकाला भाजपाने घटनाबाह्य म्हणत राज्यात घोटाळ्यांवर उत्तर देण्याऐवजी मुस्लींना कोटा विधेयक देऊन लांगुलचालन केल्याचा आरोप केला आहे. या विधेयकाला जशी मंजूरी मिळाली तशी भाजपाचे नेते नारेबाजी करीत विधानसभेत घुसले आणि स्पीकरच्या सीटवर चढून बसले. तसेच या विधेयकाच्या प्रती देखील फाडून टाकल्या. तसेच स्पीकरवर कागदाचे तुकडे फेकले.

### विधेयकाला आव्हान देणार – भाजपा

हनी ट्रॅप घोटाळ्यावर चर्चा घडवून आणण्या ऐवजी मुख्यमंत्र्यांनी मुस्लीमांना चार टक्के आरक्षणाचे विधेयक मांडण्यात व्यस्त होते. त्यामुळे आम्ही याचा विरोध केला आहे. सत्ताधारी आमदारांनी कागद फाडून आमच्यावर टाकले. पुस्तके आमच्यावर फेकली आहेत. आम्ही कोणाला नुकसान पोहचवले नाही. भाजपा या विधेयकाला कायदेशीर आव्हान देण्याची तयारी करीत आहे असे भाजपाचे आमदार भरत शेट्टी यांनी म्हटले आहे.



## छावा चित्रपटावर बंदी घाला–मौलाना रझवी

मुंबई । प्रतिनिधी

सध्या देशभरात चर्चेत असलेला 'छावा' चित्रपट आता वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या चित्रपटातील मुघल बादशाह औरंगजेबाच्या चित्रणावरून तरुणांची मने भडकवली जात असून, नागपूरच्या दंगलीसाठी हा चित्रपट कारणीभूत आहे, असा आरोप करत ऑल इंडिया मुस्लिम जमातचे अध्यक्ष मौलाना शाहबुद्दीन रझवी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अमित शाह यांना पत्र लिहून चित्रपटाचे दिग्दर्शक, लेखक आणि निर्मात्यांवर कायदेशीर कारवाईची मागणीही केली आहे. नागपूरमध्ये नुकत्याच उसळलेल्या हिंसाचाराने राज्यभर खळबळ माजवली आहे. औरंगजेबाची कबर हटवण्याच्या ◀◀ पान २ वर

### डॉ.पाखरे यांचे निधन

बीड । पतिनिधी

**शहरातील प्रसिध्द डॉक्टर के डी पाखरे यांचे हृदयविकाराने प्रयागराज येथे निधन झाले. आपल्या काही मित्रासमवेत ते दौऱ्यावर असताना ही दुर्घटना घडली. जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा.सुशीलाताई मोराळे यांचे ते पती होते.**



बीड शहरात आणि जिल्ह्यात नावाजलेले डॉ के डी पाखरे हे नेत्ररोग तज्ज्ञ म्हणून सुपरिचित होते. आपल्या काही मित्रांसोबत ते प्रयागराज दौऱ्यावर होते. त्या ठिकाणी त्यांना अचानक हृदय विकाराचा त्रास झाला, उपचार सुरु ◀◀ पान २ वर

## दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या घरी बेहिशोबी रोकड

### सर्वोच्च न्यायालयाने दिली चौकशीस परवानगी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**शुक्रवारी (२१ मार्च) सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी बेहिशेबी रोख रक्कम सापडल्याच्या वृत्तानंतर त्यांच्याविरुद्धच्या आरोपांची अंतर्गत चौकशी सुरू करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शविली. सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायाधीश या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी एकत्र आले होते.**

माध्यमांच्या वृत्तानुसार १४ मार्च रोजी होळीच्या रात्री न्यायाधीशांच्या निवासस्थानी आग लागली तेव्हा अग्निशमन दलाच्या जवानांना ही रोकड सापडली. न्यायाधीश त्यांच्या




घरी त्यावेळी उपस्थित नव्हते. त्यांच्या कुटुंबाने आपत्कालीन सेवांना फोन केला होता. रोख रकमेची माहिती पोलिसांना देण्यात आली. ती सरकारी अधिकाऱ्यांकडून ◀◀ पान २ वर

## गो हत्येचा वारंवार गुन्हा करणाऱ्यांवर आता मकोका लागणार–मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**कायद्यानुसार गो हत्या करणे गुन्हा आहे. मात्र गो हत्येचा गुन्हा वारंवार केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. वारंवार अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यानुसार यापुढे कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला.**

श्रीगोंदा येथील कायदा सुव्यवस्थेच्या बाबत सदस्य संग्राम जगताप यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे २ नोव्हेंबर २०२४ रोजी दोन समाजामध्ये वाद झाला. या वादाचे नंतर मारहाणीत रूपांतर झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. तसेच मारहाणीत जखमींना पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले. दुर्दैवाने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केलेल्या एका इसमाचा यात मृत्यू झाला. पोलिसांनी यामध्ये ◀◀ पान २ वर

## औरंगजेबाची कबर हटवा, ती राष्ट्रीय स्मारकांच्या व्याख्येत बसत नाही हायकोर्टात याचिका दाखल



मुंबई । प्रतिनिधी

औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी करत हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. आरटीआय कार्यकर्ता केतन तिरोडकर यांनी ही याचिका दाखल केली आहे. औरंगजेबाची कबर ही राष्ट्रीय स्मारकांच्या व्याख्येत बसत नाही, त्यातून पुढच्या पिढीला वारसा किंवा शिकवण ◀◀ पान २ वर

## पेन्शनधारकांसाठीच्या नियमात पीएफआरडीने केले बदल

### १ एप्रिल पासून नवे नियम लागू होणार

पुणे । प्रतिनिधी

निवृत्त वेतनधारक **कर्मचाऱ्यांसाठी ३१ मार्च २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी मूलभूत नियम ५६(जे) अंतर्गत निवृत्त झालेल्या, स्वेच्छेने सेवा सोडलेल्या किंवा निवृत्त झालेल्या एनपीएस अंतर्गत पूर्वी समाविष्ट असलेल्या व्यक्ती यूपीएस कव्हर निवडण्यापूर्वी ग्राहकाचे निधन झाल्यास, त्यांचा कायदेशीर जोडीदार नोंदणी करण्यास पात्र आहे.** ◀◀ पान २ वर




### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: १०९.५० क्विंटल** | | |
| २,३५० | २,८५१ | २,५९२ |
| **ज्वारी/हायब्रिड:१७३.००क्विंटल** | | |
| १,८०० | ३,५४० | २,४६२ |
| **मका/लोकल:३६.०० क्विंटल** | | |
| २,२११ | २,२११ | २,२११ |
| **तूर : ७.५० क्विंटल** | | |
| ६,८२१ | ६,९४१ | ६,८८१ |
| **उडीद : ६.०० क्विंटल** | | |
| ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| **बाजरी: ३६.५० क्विंटल** | | |
| २,०८१ | २,८४० | २,५६५ |
| **मुग :४.५० क्विंटल** | | |
| ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| **सोयाबीन: ५०.०० क्विंटल** | | |
| ३,९५० | ३,९५० | ३,९५० |
| **हरभरा: ४९.०० क्विंटल** | | |
| ४,०१५ | ५,११५ | ४,८९३ |

# आग्रा येथे होणार छत्रपती शिवाजी महाराजाचे स्मारक

## शासनाचा निघाला जीआर ; शिवप्रेमींमध्ये उत्सव

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्रयात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणा शिवजयंती दिनी केली होती. अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यातही आग्रायातील भव्य स्मारकाची तरतूद करण्यात आल्याचे दिसून आले. आता, आग्रयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबत महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. आता, या स्मारकाच्या उभारणीसाठी कार्यान्वयीन व निधीची जबाबदारी राज्याच्या पर्यटन विभागाकडे देण्यात आली असून याबाबतचा शासन निर्णय शुक्रवारी निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे भव्य स्मारकाच्या उभारणीस येत्या काळात गती लाभणार आहे.**



### शिवरायांची गाथा सांगणारे संग्रहालय

आग्रा येथील ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, ती जागा–वास्तू महाराष्ट्र शासन या प्रकल्पात अधिग्रहीत करणार आहे. याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक निर्माण करण्यात येणार आहे. या शौर्य स्मारकामध्ये महाराजांचा जाज्वल्य इतिहास मांडला जाणार आहे. त्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे उपक्रम संग्रहालय, दृकश्राव्य कार्यक्रम, माहितीपट आदी राबविण्यात येणार आहेत.

### देशभरातली पर्यटकांसाठी प्रेरणास्थान बनेल

ऐतिहासिक आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असलेल्या घटनेबाबात मराठीच नव्हे तर इतिहासप्रेमी पर्यटकांत औत्सुक्य असते. आग्रा येथे ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत राहीले त्या ठिकाणी आवर्जून जाण्याचा प्रयत्न पर्यटक करतात, मात्र, या ठिकाणी कोणतीही ऐतिहासिक बाब, स्मारक, संग्रहालय नसल्याने या पर्यटकांपर्यंत हा जाज्वल्य इतिहास पोहचत नाही. महाराष्ट्राच्या बाहेर अशाप्रकारचा अत्यंत दुर्मिळ असा केलेला पराक्रम ही इतिहासातील अत्यंत महनीय आणि अभ्यासपूर्ण बाब आहे. अशा स्थळासाठी आणि त्या दैदिप्यमान इतिहासाचे उदात्तीकरण आणि तो वारसा पुढच्या पिढ्यांकडे कायम रहावा, त्या स्थळांची, त्या वारशांची जतन, सवंर्धन आणि विकास करण्याकरिता शासनाने इतर राज्यातील अशी स्थळे सुध्दा विकसित करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आग्रयातील ज्या ठिकाणी कैद राहिलेले ती जागा महाराष्ट्र सरकार उत्तर प्रदेश सरकारकडून अधिग्रहित करणार आहे. या जागेवर शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारले जाणार असून आग्रयातील ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# वाटचाल विनाशाकडे...

जागतिक तापमानात झालेली वाढ गंभीर स्थितीत पोहोचली असल्याचे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना मान्य नसेलही; परंतु ते वास्तव आहे, हे जगाने मान्य केले आहे. वनसंपदेवर मनमानी पद्धतीने कुऱ्हाड चालवून निसर्गचक्राचे ताळतंत्र त्याने बिघडवले आहे आणि त्याचा अनुभव आपल्याला वेळोवेळी येत आहे. झारखंड, मध्य प्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओडिशा आणि छत्तीसगड यांसारख्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वनतोड झाली आहे. शेतजमिनी वाढवण्यासाठी, रस्ते, धरणे, औद्योगिक क्षेत्रे, महानगरांचे विस्तार, कोळसा, लोह, बॉक्साइट यांसाठी मोठ्या प्रमाणात जंगलाचा नाश केला जात आहे. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात जंगलतोडीचा दर वाढत असून, याचा परिणाम पर्यावरण, हवामान, जैवविविधता आणि स्थानिक समुदायांवर होत आहे.

फूड अँड अ‍ॅग्रीकल्चर ऑर्गनायझेशनच्या अहवालानुसार, जगभरात दरवर्षी सुमारे १० दशलक्ष हेक्टर जंगल नष्ट होत आहे. १९९० ते २०२० या ३० वर्षांत, जगभरातील एकूण ४.२ कोटी हेक्टर जंगल नष्ट झाले आहे. ब्राझील, पेरू, कोलंबिया येथील अ‍ॅमेझॉन रेनफॉरेस्ट अवैध शेती आणि खनिज उत्खननामुळे वेगाने नष्ट होत आहे. इंडोनेशिया आणि मलेशिया यांसारख्या राष्ट्रांत उद्योगामुळे मोठ्या प्रमाणावर जंगलांच्या कत्तली होताहेत. कॅलिफोर्नियामध्ये अलीकडेच लागलेल्या आगीमध्ये प्रचंड प्रमाणात वनसंपदा जळून खाक झाली. अ‍ॅमेझॉन रेनफॉरेस्ट हे पृथ्वीवरील सर्वात मोठे आणि जैवविविधतेने समृद्ध असे जंगल आहे. याला 'पृथ्वीचे फुफ्फुसे' असेही म्हटले जाते, कारण हे जंगल मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड शोषून ऑक्सिजन तयार करते; परंतु गेल्या काही दशकांमध्ये अ‍ॅमेझॉनमध्ये वारंवार लागणाऱ्या आगींमुळे पर्यावरणाच्या संतुलनाला मोठा धोका निर्माण झाला आहे. आधुनिक मानवाला जंगल म्हणजे आपली फुफ्फुसे आहेत, हेच मान्य नाही काय अशी आजची स्थिती आहे. वास्तविक, याच जंगलांच्या माध्यमातून कार्बन डाय ऑक्साइड आणि ऑक्सिजन यांची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात होत असते. जंगलातील बारीक तृणही अतिशय महत्त्वाचे असते. जंगलामुळे जमीन चांगली राहते. जंगले ही माती धरून ठेवण्याचे मोलाचे काम करतात.

जमिनीमध्ये न्युट्रियंटस् टाकतात.

महाराष्ट्र हे जैवविविधतेने समृद्ध असलेले राज्य असून, येथे सह्याद्री पर्वतरांगांपासून विदर्भाच्या दाट जंगलांपर्यंत विविध प्रकारची वने आढळतात. मात्र, वाढते शहरीकरण, औद्योगीकरण आणि कृषी विस्तार यामुळे राज्यातील वनक्षेत्रावर ताण येत आहे. महाराष्ट्राच्या एकूण भूप्रदेशाच्या १६.५१ टक्के भागावर वनावरण आहे. देशात महाराष्ट्राच्या वनक्षेत्राचा वाटा ७.४ टक्के इतका आहे. जागतिक बायोडायव्हर्सिटी लक्ष्य आणि पॅरिस करारानुसार, प्रत्येक देशाच्या एकूण भूप्रदेशाच्या किमान ३३ टक्के भागावर वनक्षेत्र असणे आवश्यक आहे. भारताच्या वनधोरणातही ही बाब नमूद करण्यात आली आहे. तथापि, भारताच्या एकूण भूभागाच्या २४.६२ टक्के क्षेत्रावर वन असल्याचे आकडेवारी सांगते. म्हणजेच, भारताला वनसंवर्धन करणे आवश्यक आहे. मात्र यादृष्टीने आपले प्रयत्न तुटपुंजे आहेत. जंगल आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाचा विषय निघाला की विकासप्रेमींकडून हमखास विचारला जाणारा प्रश्न म्हणजे, 'विकास करायचाच नाही का?' हा प्रश्न सार्थ असला तरी त्याचे उत्तर वनाचा ऱ्हास न करता वनसंपत्तीचा वापर कसा करता येईल यादृष्टीने नियोजन करणे हे आहे. जंगलांमध्ये असंख्य प्रकारचे बारीकसारीक किडे असतात, जीवाणू असतात, ज्यांचा उपयोग खूप मोठा असतो. ते सामान्य माणसाला ठाऊक नसते. अनेक प्रकारच्या संशोधनातून जैवसाखळीसाठी, पर्यावरणासाठी आणि माणसाच्या आरोग्यासाठी हे घटक किती महत्त्वाचे आहेत हे स्पष्ट झालेले आहेत. अनेक जीवाणू किंवा किडे हे रोग पसरवणार्या जीवाणूंचा नाश करणारे असतात. आपण जंगलाचे अस्तित्व धोक्यात आणले तर अशा जीवांनादेखील धोका निर्माण होईल आणि परिणामी मानवाचे आरोग्य धोक्यात येईल. वनसंवर्धनाच्या नावाखाली आपल्याकडे वृक्षरोपणाच्या मोहिमा राबवल्या जातात; पण 'फ्लॉवरपॉट फ्रॉरेस्ट्री' करण्याने मुख्य हेतू साध्य होणार नाही. गुलमोहरासारखी झाडे न लावता जी स्थानिक झाडे आहेत त्यांची लागवड केली पाहिजे. लिंब, चिंच, कवठ यांसारखी झाडे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात वाढतात आणि ती सर्वच दृष्टीने उपयोगाची देखील आहेत. तेव्हा अशा पारंपरिक झाडांची लागवड केली पाहिजे. तरच आपण पर्यावरणाचे म्हणजेच जंगलांचे संरक्षण, संवर्धन करू शकतो. वन ऱ्हासाच्या आणि वनसंवर्धनाच्या, वनरक्षणाच्या या मुद्द्याकडे आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे. वातावरणात सोडला जाणारा प्रचंड प्रमाणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेणारी एकमेव व्यवस्था आहे ती म्हणजे जंगले. ती निसर्गाने तयार केलेली आहे. या व्यवस्थेमुळे मानव पृथ्वी या ग्रहावर वास्तव्य करू शकतो आहे. त्यावरच घाला घालणे हा कृतघ्नपणा आहे.

# आ.सुरेश धस यांच्याकडून मोठ्या रुग्णालयातील उपचाराचा खर्च आणि मेडिकलची 'दुकानदारी' वर विचार करण्याची मागणी

## गोरगरीब रुग्णांची दखल घेण्याची गरज..

आष्टी । प्रतिनिधी

**राज्यातील मोठ्या हॉस्पिटल मधील अनेक हॉस्पिटल्स ही धर्मादाय अंतर्गत आर्थिक फायदा घेतात परंतु ते रुग्णांना सेवा देत नाहीत तसेच मोठे हॉस्पिटल्स मध्ये देखील उपचाराच्या खर्चापेक्षा स्वत:च्या नातेवाईकांचीच असलेली मेडिकल दुकानाद्वारे गोरगरिबांना लुटण्याचे धंदे सुरू आहेत या गंभीर प्रश्नाविषयी आ.सुरेश धस यांनी विधानसभेत आवाज उठवल्याने गोरगरीब सामान्य नागरिकांनी व्यक्त केले आहे.**

महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये गेल्या चार महिन्यापासून राज्यभरातील अन्यायग्रस्तांचे कैवारी आणि गोरगरीब जनतेचे पाठीराखे म्हणून ओळख निर्माण केलेले धडाडीचे आ.सुरेश धस यांनी विधानसभेमध्ये मोठ्या हॉस्पिटल मधील उपचाराचा खर्च आणि त्याच हॉस्पिटल मधील नातेवाईकांचेच असलेल्या मेडिकल दुकानदाराची '' दुकानदारी '' याबाबतचे भीषण वास्तव मांडले असून याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे यामुळे राज्यभरातील गोरगरीब रुग्णांची हेळसांड थांबणार असून राज्यभरातील धर्मदाय अंतर्गत असलेल्या रुग्णालयातील कारभार चव्हाट्यावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे मात्र याचबरोबर शासकीय रुग्णालयामधील व्यवस्था अध्यायवत आणि पारदर्शी करण्याची देखील गरज निर्माण झालेली आहे आ.सुरेश धस यांच्या विधानसभेतील या अभ्यासपूर्ण विषय मांडणीमुळे गोरगरीब रुग्णांना या उपायोजनेमुळे दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे आमदार सुरेश धस यांनी १९९९ पासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी द्वारे सर्व पक्षीय सर्व धर्मीय जाती जमातीतील गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीद्वारे करोडो रुपयांचे आर्थिक सहाय्य आतापर्यंत मिळवून दिले आहे याची मंत्रालयामध्ये सतत चर्चा असते केवळ बीड जिल्ह्यातील नव्हे तर राज्यातील अनेक जिल्ह्यातील रुग्णांना त्यांनी या सेवेचा लाभ मिळवून दिला आहे या विधानसभा निवडणुकीनंतरच्या पाचव्यांदा मिळालेल्या विजयानंतर त्यांनी गोरगरीब रुग्णांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्यासाठी विधानसभा क्षेत्रांतर्गत दोन आरोग्य दूत नियुक्त केले असून त्यांच्या द्वारे विविध योजनेद्वारे रुग्णांना आर्थिक सहाय्य मिळवून दिले जात आहे आणि ज्या रुग्णांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळत नाही अशा रुग्णांसाठी वैयक्तिक संपर्क साधून रुग्णांची देयके कमी करण्यामध्ये देखील ते सतत प्रयत्नशील असतात नवीन माहिती प्राप्त झाल्यानुसार पुणे शहरातील रुबी हॉल, जहांगीर हॉस्पीटल,पुणे हॉस्पिटल, संचेती हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल, दीनानाथ मंगेशकर, आदित्य बिर्ला हॉस्पिटल ही रुग्णालये धर्मादाय आयुक्तालयाच्या अंतर्गत येत असूनही सर्वसामान्य रुग्णांना याची माहिती नसते अहिल्यानगर येथील अनेक हॉस्पिटल या योजनेचा लाभ



घेत आहेत परंतु रुग्णांना याची कल्पना देत नाहीत हे देखील वास्तव आहे वास्तविक पाहता राज्यातील सर्व रुग्णांना हॉस्पिटलमध्ये धर्मादाय अंतर्गत असल्याबाबतचा फलक लावणे बंधनकारक आहे राज्यामध्ये एकूण ४३० धर्मादाय रुग्णालय असून त्यातील १० % खाटा या १ लाख ८० हजार रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या आर्थिक दुर्बलांसाठी तर आणखी १०% टक्के खाटा या निर्धन म्हणजे ८५ हजार रू वार्षिक उत्पन्न असणाऱ्या रुग्णांसाठी राखीव असतात तसेच आर्थिक दुर्बल रुग्णांना उपचारांमध्ये ५०% सवलत तर निर्धन रुग्णांना १००% मोफत मिळण्याची तरतूद उच्च न्यायालयाने सन २००३ मध्ये एका निकालाद्वारे केली आहे परंतु याबाबत गोरगरीब रुग्णांना काही फायदा होत नसल्याचे दिसून येत आहे आ.सुरेश धस यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांमध्ये १) मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत होते परंतु रुग्णालयाचे एकूण बिल आणि मिळणारी मदत यामध्ये मोठी तफावत असते २) राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०११ मध्ये संबंधित आजारांच्या उपचारासाठी जे दर निश्चित केले आहेत तेच दर सन २०२५ मध्ये देखील असल्याने रुग्णालयातील प्रशासनाने योजना अंमलात अन्याय मध्ये अडचणी निर्माण होत असल्याचे दिसून येत असल्याने या बाबीकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे ३) या धर्मादाय रुग्णांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ज्या समित्या गठित केलेले आहेत त्या काम करत नसल्याचे दिसून येत आहे ४) रुग्णालयातील उपचाराच्या आणि औषधांच्या दराविषयी निश्चित धोरण ठरवण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

# वडवणी तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडत होणार

वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी तालुक्यातील सन २०२५ ते २०३० कालावधीत गठीत होणाऱ्या ३५ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडत हि २५ मार्च रोजी तहसील कार्यालय सभागृहात होणार आहे तरी या सोडत कार्यक्रमास तालुक्यातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार वैभव महेंद्रकर यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.**

वडवणी तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडत मा. जिल्हाधिकारी बीड यांचे अधिसुचना जा.क्र.२०२५/जिबी/डेस्क-२/२०२५-२०३८ ग्रा.पं. सरपंच आरक्षण /कावी-६४३ दि. १७/०३/२०२५ अन्वये ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील राजपत्र असाधारण भाग चार व दि. १०/०३/२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) नियम १९६४ मधील नियम ३ अ प्रमाणे तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळया प्रवर्गासाठी तसेच समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता (सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी) गठीत होणा-या ग्रामपंचायतीकरिता सरपंच पदासाठी सोडत पध्दतीने आरक्षण दिनांक २५ मार्च २०२५ सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय वडवणी येथील सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व नागरिकांनी वडवणी तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास तहसिल कार्यालय वडवणी येथील सभागृहात दि. २५ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे.

# डॉ.ओमप्रकाश शेटेंची आयुष्मानच्या अध्यक्षपदी निवड

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा गोरगरिबांचे देवदूत म्हणून परिचित असलेल्या डॉ.ओमप्रकाश शेटे यांना पदोन्नती मिळाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदी निवड केली आहे. त्यांची निवड व कार्यकक्षा याबाबत सरकारच्या वतीने शासकीय परिपत्रक काढण्यात आले आहे. सरकारकडून झालेला हा सन्मान त्यांच्या कष्टाचे व परिश्रमाचे मूल्य अधोरेखित करणारा आहे. डॉ. शेटे यांच्याकडे आरोग्य क्षेत्रातील महत्वपूर्ण जबाबदारी आल्यामुळे सर्वसामान्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू म्हणून डॉ.ओमप्रकाश शेटे सबंध महाराष्ट्राला परिचित आहेत. फडणवीस यापूर्वी मुख्यमंत्री असताना डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून केलेले काम उल्लेखनीयच नाही तर ऐतिहासिक आहे. तत्कालीन सरकारमध्ये फडणवीस यांचा 'सातवा माळा' गोरगरीब रुग्णांसाठी आरोग्य मंदिर बनला होता. त्या मंदिरातील पुजारी म्हणून शेटे यांनी केलेली रुग्ण सेवा अभूतपूर्व होती, याला महाराष्ट्र साक्षी आहे. त्यावेळी लाखो लोकांना योजनेचा लाभ देत मुख्यमंत्री सहायता निधीतून ६०० कोटी व धर्मादाय कोट्यातून एक हजार दोनशे कोटींचे उपचार करण्याचा विक्रम करण्यात आला होता. मात्र महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये गरीब रुग्णांना उपचारासाठी मदत मिळणे दुरापास्त झाले होते. राज्यामध्ये परत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी आपल्या खास विश्वासू शिलेदारांना सोबत घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे निकटवर्तीय असलेल्या डॉ.ओमप्रकाश शेटे यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने फडणवीस यांच्या मान्यतेने प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा फुले जनआरोग्य योजना एकत्रिकरण करुन पाच लाख रुपयांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत नेण्याची जबाबदारी डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्यावर सोपवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्वकांक्षी योजना म्हणून परिचित असलेल्या आयुष्मान भारत योजनेच्या महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी डॉ. ओमप्रकाश शेटे यांची निवड करण्याचा महत्वपूर्ण निर्णय फडणवीसांनी घेतला आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. विधान परिषदेच्या सभागृहात अधिवेशनामध्ये सत्ताधारी व विरोधक यांनी लक्षवेधी लावत आयुष्यमान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजना यातील त्रुटीवर प्रचंड टीका केली होती. या योजनेतील त्रुटीमुळे सामान्य माणसांना पाच लाख रुपयाचा लाभ मिळत नाही असा आरोप सर्वांनी केला होता. कदाचित या योजनेला शेवटच्या घटकापर्यंत देण्याकरिता व झारीतले शुक्राचार्य बाजूला करण्याकरिता डॉ.ओमप्रकाश शेटे सारखा अनुभवी व सक्षम पर्याय म्हणून फडणवीस यांनी त्यांच्यावर जबाबदारी सोपवली असल्याचे समजते. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अशी एकत्रित असलेल्या आयुष्मान योजनेमध्ये राज्यातील १८०० पेक्षा जास्त रुग्णालये अंगीकृत आहेत. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या हॉस्पिटलवर चाप बसण्याची गरज आहे. रुग्ण आणि रुग्णालये दोन्ही वाचली पाहिजेत यासाठी डॉ. ओमप्रकाश शेटे कसा सुवर्णमध्य साधतात? हे पहावे लागेल. जबाबदारी सोबतच मिळालेल्या अधिकारांचा वापर करून डॉ. शेटे हे सामान्य रुग्ण व रुग्णालये या दोघांमध्ये योग्य समन्वय साधतील यात शंका नाही. यासाठी यापूर्वीचा दांडगा अनुभव त्यांच्या कामी येईल.



# घरगुती गॅस सिलिंडरचा वापर करणाऱ्या हॉटेलवर कारवाई;१३ सिलेंडर जप्त

अंबड । प्रतिनिधी

**अंबड शहरांमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करणारे हॉटेल व धाब्यावर आज कारवाई करण्यात आली. यावेळी १३ गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले . सदरील कारवाई जिल्हा पुरवठा अधिकारी व अंबड तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तहसील पुरवठा विभागाचे पुरवठा निरीक्षक किरण किरणकुमार खांडेभराड तसेच विभागातील कृष्णा शिंदे, अरविंद भालेराव यांनी ही सदर धडाकेबाज कारवाई केली आहे. सदरील हे कारवाई पुरवठा विभागाने शुक्रवारी (ता. २१ मार्च रोजी) केली आहे.**

हॉटेल गौरी, सुख सागर बार,सावता हॉटेल, हॉटेल सम्राट,ओम साई दाळबट्टी सेन्टर,मोरया



हॉटेल , सुवर्णा स्वीट हॉटेल,हॉटेल सद्गुरू,राजे चहा कट्टा, श्रावणी कॉफी शॉप, अमित रेस्ट्रो , यांच्याकडून १३ गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले. तसेच पुढील कारवाई नियमाप्रमाणे त्यांच्यावर करण्यात येणार आहे. सदरील कारवाई गोपनीय पद्धतीने करण्यात आली. घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा व्यवसायीक वापर करणाऱ्या त्यांच्याकडून १३ सिलेंडर जात केले. ही कारवाई अंबड शहरातील व परिसरात घरगुती गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात व्यवसायिक वापर होत असल्याची तक्रारी घरगुती नागरिकाकडून करण्यात येत होत्या. त्याचीच दखल घेत अंबड तहसिलच्या पुरवठा विभागाने दखल घेऊन तात्काळ कारवाई केली. सदरील कारवाई मध्ये. एकुण १३ घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर करणाऱ्या या हॉटेल व धाबा मालकावर कारवाईया प्रस्ताव जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे पाठवण्यात येणार आहे. अशी माहिती अंबड पुरवठा विभागाचे पुरवठा निरीक्षक किरण कुमार खांडेभराड यांनी दिली आहे.

# अंबडमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प देण्याचे सह आयुक्तांनी प्रयत्न करावेत-किर्डे

अंबड । प्रतिनिधी

विभागीय सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग श्री देविदास टेकाळे यांनी नगर परिषद अंबड जि. जालना येथे भेट देऊन १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत अंबड नगर परिषदेच्याघनकचरा व्यवस्थापन डम्पिंग ग्राउंड पाहणी केली. तसेच नगर परिषद कार्यालयात मुख्याधिकारी व सर्व अधिकारी कर्मचारी यांचा कामकाजा संबंधी आढावा घेतला मा.प्रधानमंत्री आवास योजना, मा.प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना, पी.जी.पोर्टल व आपले सरकार वरील प्रलंबित तक्रारी इत्यादींचा आढावा त्यांनी घेतला. व मुख्याधिकारी यांना सूचना केल्या की एखादा



मोठा सौर ऊर्जा प्रकल्प उभा करण्यासाठी प्रयत्न करावेत. अशा सूचना केल्या.

तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती यांचा ऑनलाईन गुगल शीट मधील माहिती भरणे बाबतचा विभागाचा आढावा देखील त्यांनी घेतला छत्रपती संभाजीनगर विभागातील ज्यां नगर परिषदांनी माहिती भरली नाही त्या नगरपरिषदांना नगर परिषद कार्यालय अंबड येथूनच संपर्क साधून माहिती भरणे बाबत सूचना केल्या. या वेळी मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, नगर परिषद अंबड मधील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## पान १ वरून...

### मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांना

भरपाईचा विषय आता अपिलात निकाली निघेल. हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या बाबीअंजर्गत अग्रिम भरपाई मिळते. हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत म्हणजेच पूर, पावसातील खंड, दुष्काळ आदी संकटामुळे पिकांचे नुकसान झाले आणि अपेक्षित उत्पादनात गेल्या ७ वर्षाच्या सरासरी उत्पादनाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर अग्रिम भरपाई मिळते. जिल्हाधिकाऱ्यांनी तशा अधिसूचना काढाव्या लागतात. शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या प्रमाणात २५ टक्के मर्यादेपर्यंत आगाऊ रक्कम देण्यात येते. म्हणजे २५ टक्के अग्रिम भरपाई मिळते.

----------

### छावा चित्रपटावर बंदी

मागणीतून सुरू झालेल्या आंदोलनानंतर दोन गटांत तणाव निर्माण झाला. या घटनेत जाळपोळ, पोलिसांवर दगडफेक झाली, ज्यात ३४ हून अधिक पोलीस जखमी झाले आणि सर्वसामान्यांचे मोठे नुकसान झाले. पोलिसांनी मुख्य सूत्रधार फहिम खानला अटक केली असून कारवाई सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मौलाना रझवी यांनी 'छावा' चित्रपटातील औरंगजेबाच्या चित्रणामुळे तरुण भडकले आणि हिंसाचाराला चिथावणी मिळाली, असा दावा केला आहे.

-----------

### कर्नाटक विधानसभेत मुस्लिम

१८ आमदारांना पुढील सहा महिन्यांसाठी विधानसभा कार्यवाहीतून निलंबित केले आहे. हनी ट्रॅप प्रकरणावरूनही कर्नाटक विधानसभेत शुक्रवारी मोठा गदारोळ झाला. भाजपचे आमदार सभागृहाच्या वेलमध्ये शिरले आणि त्यांनी अध्यक्षांच्या खुर्चीसमोर कागदपत्रे फाडली आणि भिरकावली. या गोंधळामुळे कर्नाटक विधानसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. दरम्यान, या गोंधळातच राज्य सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर केले. भाजपने हा निर्णय असंवैधानिक असल्याचे सांगत त्याला कायदेशीररित्या आव्हान देणार असल्याचे म्हटले आहे.

---------

### गो हत्येचा वारंवार गुन्हा करणाऱ्यांवर आता

कुठल्याही प्रकारची दिरंगाई केल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत गुन्हेगाराला अटकही केली. मात्र न्यायालयातून जामिनावर त्याची सुटका झाली. श्रीगोंदा शहरातील प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करण्यात येऊन कोणालाही सोडण्यात येणार नाही, असेही गृह राज्यमंत्री भोयर यांनी सांगितले.

----------

### दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या

भारताच्या सरन्यायाधीशांना कळवण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाचे कॉलेजियम देखील न्यायाधीशांची दिल्लीहून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याच्या बाजूने आहे, जिथून त्यांची ऑक्टोबर २०२१ मध्ये राष्ट्रीय राजधानी दिल्लीत बदली झाली होती. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, न्यायमूर्ती शेखर कुमार यादव यांच्याबद्दल सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायव्यवस्थेत नवा वाद निर्माण झाला आहे. गेल्या वर्षी ८ डिसेंबर रोजी विश्व हिंदू परिषदेने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात त्यांनी सांप्रदायिक भावना व्यक्त करणारी वक्तव्ये केली होती. वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी या घडामोडीवर प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचार ''वर्षानुवर्षे सुरू आहे. न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराचा मुद्दा हा खूप गंभीर मुद्दा आहे. देशातील वरिष्ठ परिषदा आणि वकिलांनी पहिल्यांदाच हा मुद्दा मांडलेला नाही. तो वर्षानुवर्षे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. संवैधानिक न्यायालयाच्या न्यायाधीशाला पदावरून हटवण्याच्या प्रस्तावाला सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या विशेष बहुमताने आणि उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सभागृहाच्या किमान दोन तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिला पाहिजे, असा नियम आहे.

-----------

### डॉ.पाखरे यांचे निधन

करण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. गेल्या तीस चाळीस वर्षेपासून बीडच्या सामाजिक चळवळीत योगदान देणाऱ्या प्रा.सुशीलाताई मोराळे यांचे ते पती होते.त्यांना दोन मुले, पत्नी असा परिवार आहे.

------------

### पेन्शनधारकांसाठीच्या नियमात

एनपीएस अंतर्गत केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन पेन्शन फ्रेमवर्कसाठी नोंदणी करण्यासाठी, पात्र कर्मचारी १ एप्रिल २०२५ पासून प्रोटीन सीआरए पोर्टल द्वारे त्यांचे नोंदणी आणि दावा फॉर्म ऑनलाइन सादर करू शकतात. प्रत्यक्ष सादरीकरण हा देखील एक पर्याय आहे. सरकारने २४ जानेवारी २०२५ रोजी एनपीएस अंतर्गत केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन पेन्शन फ्रेमवर्क म्हणून यूपीएसची अधिकृत घोषणा केली. पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणाने एका अधिसूचनेत नमूद केले आहे की पात्र केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना १ एप्रिलपासून लागू होणाऱ्या युनिफाइड पेन्शन स्कीम (यूपीएस) मध्ये नोंदणी करण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. सूचनेत या योजनेचे नियम स्पष्ट केले आहेत, जे पाच मुख्य फायदे देतात: निश्चित पेन्शन, निश्चित कुटुंब पेन्शन, निश्चित किमान पेन्शन, महागाई निर्देशांक आणि निवृत्तीवेतनाच्या वेळी एकरकमी पेमेंट, ग्रॅच्युइटीसह, हे सर्व एका व्यापक पॅकेजमध्ये समाविष्ट आहे. यूपीएस १ जानेवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी तसेच भविष्यात सामील होणाऱ्यांसाठी खुले आहे, एनपीएस वरून यूपीएसमध्ये स्विच करण्याचा पर्याय आहे. राज्य सरकारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना पर्यायी आधारावर ही योजना देऊ शकतात.

----------

### औरंगजेबाची कबर हटवा, ती राष्ट्रीय

घेण्यासारखे काहीही नाही असे केतन तिरोडकर यांनी याचिकेत म्हटले आहे. त्यामुळे केंद्रिय पुरातत्व विभागाला ऐतिहासिक वास्तूंच्या यादीतून औरंगजेबाची कबर हटवण्याचे निर्देश देण्याची याचिकेत मागणी करण्यात आली आहे. याबाबत लवकरच सुनावणी अपेक्षित असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. कबर पुरातत्व विभागाच्या यादीतून वगळली की राज्य सरकारने ती तिथून कायमची हटवून टाकावी, जेणेकरून भविष्यात पुन्हा यावरून जातीय तेढ निर्माण होणार नाही असे मत केतन तिरोडकर यांनी व्यक्त केले आहे. याशिवाय छावा सिनेमाच्या प्रदर्शनावर तूर्तास बंदी घालण्याबाबतही राज्य सरकारने विचार करण्याची विनंती या याचिकेतून करण्यात आली आहे. दरम्यान, औरंगजेबाच्या कबरीवरुन राज्यातील वातावरण चांगलेच गरम झाल्याचे पाहायला मिळत आहे. औरंगजेबाची कबर उखडण्याच्या मुद्द्यावरुन नागपूरमध्ये दंगलही उसळली होती. या प्रकरणानंतर सुरक्षा व्यवस्था चोख करण्यात आली आहे. औरंगजेबाची कबर झाकून ठेवण्यात आली आहे. नागपूरसह मराठवाड्यात तणाव निर्माण होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे राष्ट्रीय तपास यंत्रणेचे एनआयए दिल्लीचे एक पथक छत्रपती संभाजीनगर शहरात दाखल झाले आहे. परभणी, जालना, नांदेड या ठिकाणीदेखील पथक गेले असून तेथील संशयित हालचालींवर लक्ष आहे. या प्रकरणात एटीएस अधिकाऱ्यांची मदत घेतली जात असल्याची माहिती आहे.

-------------

### आग्रयातील छत्रपती शिवाजी

शिवरायांची गाथा सांगणारे संग्रहालयही याठिकाणी उभारण्यात येणार आहे. राज्य सरकारच्या पर्यटन विभागाकडून स्मारकासाठी आर्थिक तरतूद केली जाणार आहे. स्मारक उभारणीसाठी पर्यटन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास तज्ज्ञ तसेच जाणकार, तज्ज्ञांची समिती स्वतंत्रपणे स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण व अनुषंगिक बाबींकरिता पर्यटन विभागाला जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळराजे शंभुराजे यांची आग्रयातून सुटका आणि महाराजांच्या पराक्रमाच्या गौरवगाथेचे स्मरण पुढील पिढ्यांसाठी करून देण्यासाठी हे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

---------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. २२ मार्च २०२५




## आष्टी तालुक्यात पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ हिची निवड

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आज पर्यंत पुरुष पत्रकार म्हणून आष्टी तालुक्यात भरपूर पत्रकार कार्यरत आहेत व पत्रकार काम करतात परंतु आष्टी तालुक्यात प्रिया सोन्याबापु पवळ ही पहिली पत्रकार होण्याचा मान तिने मिळवला आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथीलही प्रिया पवळ प्रिया पवळ दैनिक पुढारीचे व दै.लोकतंत्र चे



पत्रकार कवी प्रेम पवळ यांची ती बहीण तसं पाहिलं तर पवळ या घराण्याला पत्रकारितेचा वारसा आहे. प्रिया पवळ तिचे शिक्षण बीसीए सेकंड ईयर झाले असून तिला शैक्षणिक काळातच सामाजिक राजकीय लिखाणाचा छंद तिने जोपासला आणि आपणही पत्रकार आहोत अशी इच्छा तिच्या मनात सारखीच होती अखेर तिने तिची इच्छा पूर्ण केली दैनिक टाइम्स (माजलगाव ) या अग्रगण्य दैनिकांनी तिला आष्टी तालुका प्रतिनिधी म्हणून घोषित केले. पहिलीच महिला पत्रकार झाल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षांव होऊ लागला आहे.ग्रामीण भागातील एक तरूणी पत्रकारिता क्षेत्रात पदार्पण करत असल्याने भविष्यात नक्कीच गावासह जिल्हय़ाचे नावलौकिक करील यात तीळमात्र शंका नसल्याचे दिसुन येत आहे.

## मुख्यमंत्र्यांचा लाडका विभाग हा कौशल्य विकास विभाग-मंत्री मंगल प्रभात लोढा

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मा. श्री. मंगल प्रभात लोढा यांनी आज विधान परिषदेत २६० च्या प्रस्तावास उत्तर देताना राज्यातील युवा उद्योजकता आणि कौशल्य विकासाला चालना देणाऱ्या महत्त्वाच्या निर्णयांची घोषणा केली.**

''पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांच्या दूरदृष्टीने आणि मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीसजी यांच्या सक्षम नेतृत्वामुळे महाराष्ट्रात कौशल्य विकास आणि उद्योजकतेला अभूतपूर्व गती मिळत आहे. तरुणांना संधी देण्याचे, पारंपारिक कौशल्यांना नवे रूप देण्याचे आणि उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याचे हे सुवर्णयुग आहे. त्यांचे मार्गदर्शन आणि पाठिंब्यामुळे महाराष्ट्र सक्षम, आत्मनिर्भर आणि पुढारलेले राज्य बनत आहे. मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली दावोसमधून, आपल्या राज्याला विक्रमी गुंतवणूक मिळाली. त्यामधून आज नवी मुंबई येथे इनोव्हेशन सिटी उभारण्याचे काम सुरु झाले असून, हा मा. मुख्यमंत्र्यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. मा. मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारामुळे आज राज्याला एक नवे स्टार्टअप धोरण मिळणार असून, ही नवीन उद्योजकांसाठी अतिशय महत्वपूर्ण बाब आहे. आज नमो रोजगार मेळावे, युवा कार्य प्रशिक्षण योजना, कौशल्य विकास केंद्र, महिला उद्योजकांना आर्थिक सहाय्य, विदेशात युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, या सारखे अनेक प्रकल्प मा. मुख्यमंत्र्यांच्या पाठिंब्यामुळे कौशल्य विकास विभागाला राबवता आले. मा. मुख्यमंत्र्यांचा लाडका मंत्री कोण हे तेच ठरवतील पण कौशल्य विकास विभाग, हा त्यांचा लाडका विभाग आहे आणि त्यामुळेच इतके उपक्रम शक्य झाले!, असे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी यावेळी बोलताना सांगितले.

राज्यातील कौशल्य विकासासाठी महत्वाच्या घोषणा

महाराष्ट्र सरकारच्या ' ' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत १ लाख नव्या स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या योजनेमुळे स्थानिक स्तरावर नव्या व्यवसायांना चालना मिळेल आणि स्टार्टअप संस्कृती अधिक बळकट होईल.

विश्वकर्मा भवन: महाड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत १२ बलुतेदार समाजासाठी 'विश्वकर्मा भवन' स्थापन करण्यात येणार आहे. या उपक्रमातून परंपरागत व्यवसायांना तंत्रज्ञानाची जोड मिळेल आणि कौशल्याधारित रोजगाराच्या संधी वाढतील.

विकासासाठी नवीन उपक्रम:

येत्या वर्षभरात महाराष्ट्रातील १०० संस्था, आस्थापना आणि स्वयंसेवी संस्थांना प्रायोगिक तत्वावर दत्तक देण्यात येणार आहे. यामुळे उद्योगांसोबत संस्थांचा थेट संबंध निर्माण होऊन विद्यार्थ्यांना अद्ययावत प्रशिक्षणाची संधी मिळेल. ट्रेन द टीचर्स भवन: मधील शिक्षकांना नवीन कौशल्यांमध्ये प्रशिक्षण देण्यासाठी विशेष 'ट्रेन द टीचर्स' भवन स्थापन केले जाणार आहे. हे केंद्र आधुनिक उद्योगाच्या मागणीनुसार शिक्षकांना प्रशिक्षित करून विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रशिक्षण देण्यासाठी मदत करेल. नवीन शैक्षणिक धोरण: महाराष्ट्र हे शासकीय औद्योगिक संस्थांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबवणारे पहिले राज्य ठरणार आहे. या धोरणामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण होईल आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक कौशल्ये मिळतील.



## पिंपळवंडी येथील रोपवाटीकामध्ये जागतीक वनदिन उत्साहात साजरा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालूक्यातील पिंपळवंडी येथील रोपवाटिका येथे जागतिक वन दिन साजरा करण्यात आला. विभागीय वन अधिकारी बीड मा.अमोल गर्कळ यांच्या आदेशाने व वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एस.काळे यांच्या उपस्थितीत वनपाल ए.एम. देवगुडे व वनरक्षक एन.के.काकडे, वनरक्षक एस.आर.राठोड,डी.टी. यदमल व महिला कर्मचारी, वन कर्मचारी सह ग्रामस्थांच्या सहकार्यातून कार्यक्रम साजरा करण्यात आला.

## बीडच्या जिल्हा परिषद बांधकाम कार्यालयाचा प्रताप

### खोकरमोहा ग्रामपंचायतला विश्वासात न घेता बनावट ना हरकत प्रमाणपत्राच्या आधारावर केले कामांचे वाटप

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील खोकरमोहा ग्रामपंचायत कार्यालय कामे करण्यास सक्षम असताना जिल्हा परिषदच्या बांधकाम कार्यालयातील अधिकाऱ्यांनी काहींना हाताशी धरून बनावट ना हरकत प्रमाणपत्राच्या आधारावर भलत्यांनाच कामे दिल्यामुळे संताप व्यक्त केला जात असून हा सावळा गोंधळ अधिकाऱ्यांनी कशामुळे केला याची चौकशी करून संबंधित अधिकांऱ्यावर कार्यवाही करावी अशी मागणी उपसरपंच वसुदेव अघाव यांनी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे .

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की खोकरमोहा ग्रामपंचायत अंतर्गत कामांची जिल्हा परिषद बांधकाम विभागाने अनेक कामे बनावट नाहरकत प्रमाणपत्राच्या आधारावर कामांची वाटप करून कार्यारंभ आदेश दिले आहेत याचा ग्रामपंचायत कार्यालयाला कुठलाच थांगपत्ता नसून वास्तविक पाहता ही कामे ग्राम पंचायत स्तरावरच केली जातात असा नियम असताना असे होत असेल तर ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था कशी टिकणार हा मोठा प्रश्न येथे उपस्थित झाला असून हा प्रकार म्हणजे ग्रामपंचायत कार्यालय खोकरमोहा यांच्या अधिकारावर गदा आणल्याचा आहे तरी आपण कार्यरंभ आदेशाची सविस्तर चौकशी करावी

वाटप केलेल्या सर्व कामांची चौकशी होई पर्यंत त्या कामाचे देयक तात्काळ थांबवण्यात यावे हे काम करण्यास ग्रा.पं. कार्यालय सक्षम असुन त्या कामाचा कार्यरंभ आदेश ग्रामपंचायत कार्यालय खोकरमोहा यांच्या नावे करण्यात यावा तसेच वरील कार्यरंभ आदेश दिलेला यंत्रणेवर योग्य ती कार्यवाही करावी असेही दिलेले पत्रकात त्यांनी म्हटले आहे या निवेदनाच्या प्रती म पालकमंत्री जीपचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, आमदार संदीप क्षीरसागर ,माजी आमदार सुनील धांडे ,यांना दिल्या आहेत.

## विहिरीत पडलेल्या लांडग्याचा वन कर्मचाऱ्यामुळे वाचला जीव

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील आठेगाव पुठ्ठा परिसरातील लांबरवाडी शिवारात एका आठ परस खोल विहिरीत रात्रीच्या अंधारात एक लांडगा पडला होता.त्याला विहिरीतून जिवंत काढण्यास वन कर्मचाऱ्यांना यश आले व लांडग्यास जिवदान मिळाले आहे.याबद्दल परिसरात वन कर्मचाऱ्यांच्या कार्याबद्दल कौतुक होत आहे.याविषयी अधिक माहिती अशी की,सावरगाव येथील शेतकरी श्रीमती सुरेखा जगन्नाथ सप्रे यांच्या लांबरवाडी शिवारातील आठ परसाच्या खोल विहिरीमध्ये दि.१९ मार्चच्या रात्री अंधारात एक लांडगा पडला होता. सबंधीत वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दि.२० मार्चला भ्रमणध्वनीवरून माहिती मिळाल्यानंतर पाटोदा वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एस.काळे यांच्या आदेशाने वनपाल अजय देवगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यूसाठी कार्यवाही करून ८ परस विहिरीत पडलेल्या लांडग्याला तीन तासाच्या अथक शर्तीच्या प्रयत्नात बाज व दोराच्या सहाय्याने विहिरीच्या वर काढण्यात आले व जंगलात सोडून देण्यात आले.हा लांडगा अंदाजे अडीच ते तीन वर्षे वयाचा असेल असे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.रेस्क्यू कार्यवाहीमध्ये वनपाल अजय देवगुडे,वनरक्षक संदीप राठोड अंमळनेर,वनसेवक शहादेव पवार,वनमजूर ए.ए.सातपुते, सोपान येवले,सतिष गर्जे,शेख बशीर, पोपट पवार,जालिंदर मिसाळ यांनी परिश्रम घेतले.





बीड: रायगड जिल्ह्यातील महाड येथे चौदारतळे सत्याग्रह निमित्ताने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतांना, रिपाइं अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, कोकण विभागाचे अध्यक्ष प्रकाश मोरे, मुंबई विभागाचे अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, रायगड जिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड

## भाजी मार्केट येथील चौकाला लोकनेते स्व.विनायक मेटे नाव देण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या मध्यवर्ती असणाऱ्या सुभाष रोड येथील भाजी मार्केट अंतर्गत असणाऱ्या चौकाला (सुभाष रोड, भाजी मंडई व राज हॉटेल कडे जाणारा रस्ता.) लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी शिवसंग्राम युवती आघाडीच्या जिल्हाप्रमुख सौ. गीतांजली देसाई यांनी निवेदनाद्वारे बीड नगरपालिका प्रशासनाकडे केली आहे.



### नामांतर केल्याने स्व. साहेबांच्या सेवाकार्याचे स्मरण होईल -गीतांजली देसाई

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांनी समाजकारण व राजकारन करताना सर्व समाजाला एकत्र घेत महाराष्ट्रभर समाज जोडण्याचे काम केले. बीड जिल्ह्याचे नाव सामाजिक कार्याने राज्यात गाजवत असताना सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणे, व्यसनमुक्त जिल्हा करण्यासाठी व्यसनमुक्ती कार्यक्रमांच्या माध्यमातून समाज जागृती करणे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील शिवस्मारक तसेच मराठा आरक्षणाच्या सोबतच धनगर व अल्पसंख्याक समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा ही स्व. मेटे साहेबांनी वेळोवेळी सभागृहात उठवला आहे.बीड शहरातील विविध विकास कामांचा सोबतच शहराला जोडणाऱ्या बार्शी नाका पुल, कांकालेश्वर मंदिर, शहेशाहवली दर्गा येथील प्रस्तावित कामे सह अन्य विकास कामे करण्याचा प्रयत्न करत आलेले आहेत, लोकनेते स्व. मेटे साहेबांनी २५ वर्ष विधान परिषदेत सर्वसामान्य लोकांसाठी आवाज उठवत असतानाच अपघाताने दुर्दैवी निधन त्याच्या वाट्याला आल्याने बीड जिल्हा एका नेतृत्वाला मुकला आहे.अश्या लोकनेत्याला आदरांजली म्हणून बीड शहरातील भाजी मार्केट येथील चौकाला लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी शिवसंग्राम युवती आघाडीच्या वतीने बीड नगर पालिका प्रशासनाला निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## यश कोचिंग क्लासच्या विद्यार्थ्यांना निरोप



**बीड । प्रतिनिधी**

बीडपासून जवळच असलेल्या कुर्ला येथील यश कोचिंग क्लासेस च्या दहावीच्या विद्यार्थ्यांना क्लासच्या वतीने दिनांक २० मार्च २९२५ रोजी निरोप देण्यात आला.यावेळी क्लासचे संचालक श्री. तुषार पाटील सर यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना 'भविष्यातील करिअरच्या संधी' याविषयी मार्गदर्शन केले. दहावीनंतर ११वी व १२ वी या दोन वर्षात चांगला अभ्यास करा व आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून आपापल्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच विद्यार्थ्यांना सुसंगतीचे महत्त्व सविस्तर सांगितले. या कार्यक्रमात दहावीच्या काही विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. दहावीच्या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना निरोप देणारा बहुधा हा जिल्ह्यातील पहिलाच क्लास असावा.

## पसायदान संस्थेस पक्क्या निवाऱ्याची गरज-डी.जी.तांदळे



**बीड । प्रतिनिधी**

पसायदान सेवा प्रकल्पाची स्थापना २०१४ साली झाली असून या प्रकल्पाच्या माध्यमातून अनाथ भटके वंचित आत्महत्याग्रस्त शेतकरी व कैद्यांच्या मुलांसाठी हक्काच्या घराची निर्मिती केली सध्या सेवा प्रकल्पामध्ये एकूण ५० मुले आणि ४० मुली सध्या पत्र्याच्या शेडमध्ये रहात आहेत. ऊन वारा पाऊस यासह नैसर्गिक आपत्ती पाहता या निरागस मुला मुलींसाठी वेगवेगळ्या पक्क्या निवाऱ्याची खरी गरज असून शाळेत येण्या जाण्यासाठी स्कूल बसची देखील अत्यंत आवश्यकता आहे. तरी इच्छुक दात्याने यासाठी पुढे येऊन मदत करण्याची गरज असल्याचे मत स्व. घनश्याम तांदळे यांच्या स्मृतीदिनानिमित्त कार्यक्रमांमध्ये व्यक्त केले यावेळी तांदळे परिवाराच्या वतीने पंगत देऊन एक महिन्या चा किराणा संस्थेकडे देण्यात आला सामाजिक कार्यातील उल्लेखनीय कार्याबद्दल सौ. रंजना व गोवर्धन दराडे यांचा मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने लक्ष्मण चाटे यांनी श्रीफळ, शाल, पुष्पहार, सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास राजकुमार कदम, डॉ. संजय तांदळे, राजेंद्र तिडके, प्रा. बाळासाहेब नागरगोजे, प्रा. अशोक नागरगोजे , पाटोदा येथील रोटी बँकेचे संचालक संतोष गर्जे ,विनोद सवासे, सय्यद युसुफ, मोहम्मद युसुफ, तांदळे परिवारातील सर्व सदस्य सदस्यासह पसायदान संस्थेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## ठेवीदारांच्या रेट्याने ज्ञानराधावर एमपीआयडी प्रस्ताव मंजूर -प्रा.उबाळे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट पैकी सर्वाधिक ठेवी असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेटवर अखेर एमपीआयडी मंजूर केल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात केली. दरम्यान केवळ ठेवीदारांच्या रेट्याने शासनाला एमपीआयडीचा प्रस्ताव मंजूर करावा लागला असून ठेवीदारांच्या मागण्यांसाठी दोन वर्षांपासुन सुरु असलेल्या आंदोलनाला यश आले आल्याचे ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांनी म्हटले आहे. व



जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव)आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. ज्ञानराधा मध्ये राज्यभरातील सर्वाधिक ठेवीदारांच्या ठेवी आहेत. ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्या यासाठी ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली रंवार उपोषण, आंदोलने केल्याने बीड पोलिसांनी सुरेश कुटे यांच्यासह जवळपास सर्वच मल्टिस्टेटमधील आरोपींना अटक केली. सर्व आरोपींना अटक करणे हे आंदोलनाचे पहिले यश आहे. ज्ञानराधावर एमपीआयडी दाखल करावा, अर्चना कुटे यांना अटक करावी अशी मागणी सुरुवातीपासून प्रा.उबाळे यांनी लावून धरली होती. यामुळे एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र काही त्रुटी निघाल्याने तो पुन्हा बीड पोलिसांकडे परत आला. या संदर्भात प्रा.उबाळे यांनी पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन त्रुटींची पूर्तता करुन आठ दिवसांत एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे पुन्हा पाठवावा अशी मागणी केली होती. दरम्यान बीड पोलिसांनी पाठिवलेल्या ज्ञानराधावरील एमपीआयडीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली असून या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात घोषण केली आहे. ठेवीदारांच्या रेट्यामुळे शासनाने एमपीआयडी मंजूर केला असून ठेवीदारांच्या आंदोलनाचे हे दुसरे यश असल्याचे प्रा.उबाळे यांनी म्हटले आहे.

पान ६ वरून...

## अखेर सायमाला आधार

शफाउद्दीन व पत्रकार हमीदखान पठाण,जावेद शेख यांनी लक्ष वेधले असता त्यांनी आधार कार्ड का रिजेक्ट होते याची इदभुत माहिती घेत आठ दिवस बीड,संभाजीनगर आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधत सायमाच्या अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी स्वतः जबाबदारी घेत नगरपंचायत, तहसील कार्यालय तसेच शाळेतील महत्त्वाची कागदपत्रांची जुळवाजुळव करून दि.२७ फेब्रुवारीला आधार कार्ड ऑनलाइन केले होते. या दरम्यान आधार कार्ड रिजेक्ट होऊ नये यासाठी वरिष्ठांशी वेळोवेळी फॉलोअप घेतला होता.मात्र १२ दिवसाचा कालावधी लोटला तरी आधार कार्ड वेटींग का आहे याचा अंदाज येत नसल्याने संभाजीनगर येथील ऑफिसचा वेळ मागुन घेत सायमालाच तिथे घेऊन जाण्याचे योजना आखली होती मात्र दि.१५ मार्च रोजी सायमाचा आधार कार्ड ऑनलाइन झाल्यांचा मँसेज आला सर्वांनी सुटेकेचा निश्वास सोडला खऱ्या अर्थाने पोस्टमास्तर विनोद गर्जे यांची शिष्टाई फळाला आली.याच संदर्भात दि.१९ मार्च बुधवार रोजी पोस्ट ऑफिस कार्यालयाच्या वतीने सायमाला आधार कार्ड देण्यात आले. यावेळी सायमा व सय्यद शफाउद्दीन, पत्रकार जावेद शेख, हमीदखान पठाण, सचिन शिंदे आदीच्या वतीने पोस्टमास्तर श्री. विनोद गर्जे,श्री.काकडे साहेब, श्री तावरे साहेब,श्री.सचिनजी कांबळे,श्री. प्रसाद मोराळे, कु.अंकिता सावंत मॅडम, श्री. बेद्रे साहेब तथा इतर कार्यालयीन सहकाऱ्यांचा शाल,पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# केंद्र सरकार शेतकऱ्यांकडून आयकर आकरणार?

केंद्र सरकार शेती उत्पन्नावर आयकर आकरण्याच्या तयारी असल्याची चर्चा अधूनमधून जोर धरत असते. त्यावर समर्थनार्थ आणि विरोधात आवाज उठवले जातात. घमासान चर्चा झडतात. आणि काही काळाने मुद्दा पुन्हा बाजूला पडतो. आता शेती उत्पन्नावर आयकर आकरण्याची चूळबुळ पुन्हा सुरू झाली. उत्पन्नावरचा कर टाळण्यासाठी आणि काळा पैसा पांढरा करण्यासाठी शेतीचा उत्पन्नाचा आधार घेतला जात असल्याचा संशय आल्याने आयकर विभागाने काही राज्यात तपासणी सुरू केली आहे.

शेती उत्पन्नावर आयकर आणि जीएसटी लागत नसल्याने काहीजण शेतीच्या उत्पन्नाच्या नावाखाली करातून सुटका करून घेत आहेत. काही प्रकरणात तर शेतीचं उत्पन्न लाखोंमध्ये दाखवलं आहे. त्यामुळं आयकर विभागाने ५० लाखांपेक्षा अधिक शेती उत्पन्न दाखवणाऱ्यांची तपासणी सुरू केली आहे. विशेष म्हणजे या ५० लाख रुपयांहून अधिक उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांकडे शेतजमिनीच नाही, असंही आयकर विभागाला तपासणी दरम्यान आढळलं आहे. २०२०-२१ पासून आयकर विभागाने काही प्रकरणात तपास सुरू केला. यामध्ये काही व्यक्तींना एक एकर जमिनीवर ५ लाख रुपये उत्पन्न दाखवलं आहे. त्यामुळे अशा व्यक्तींना आयकर विभागाने उत्पन्नाचे पुरावे द्यायला सांगितलं. या पुराव्यात मात्र जमिनीची विक्री करून कमाई केल्याचा कथित शेतकऱ्यांकडून सांगण्यात आलं.



पण यावरही आता आयकर विभागाने सॅटेलाईट इमेजेस वापरुन शेतकरी किंवा जी व्यक्ती असेल त्याने खरंच शेतमाल विकला आहे की, शेत जमिनी विकली हेही तपासलं जाणार आहे. त्यामुळं केंद्र सरकारनं या पद्धतीच्या कर चुकवेगिरीला आळा घालण्यासाठी शेतकऱ्यांवर आयकर लावला पाहिजे, अशी चर्चा सुरू झाली आहे. वास्तविक शेती उत्पन्न दाखवून कर चुकवेगिरी करणारे देशात गब्बर झाले आहेत. त्यामध्ये काही राजकारणी, उद्योगपती आणि अधिकाऱ्यांचा भरणा आहे. या मंडळीकडून शेती उत्पन्नाच्या नावावर कर चुकवला जातो. कृषी क्षेत्रातील मोठ्या कंपन्याही यामध्ये असल्याचं आयकर विभागाच्या निदर्शनास आलं. म्हणजे शेतीच्या नावावर ही मंडळी पोसली जात आहे. शेती उत्पन्नावर कर आकारला तर या गैरव्यवहाराला आळा घालता आणि शेती उत्पन्नाच्या नावाखाली चालेला गैरव्यवहार रोखता येईल. यापेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे या निमित्ताने शेतकऱ्यांचं खरं उत्पन्नही साऱ्यासमोर येईल. शेतकऱ्यांना शेती उत्पन्नावर कर भरावा लागत नाही, यामुळं शहरी मंडळीच्या पोटात कायम दुखतं. पण शेतकऱ्यांचं उत्पन्न कर भरण्याइतकंही नाही, या भयाण वास्तवाकडे मात्र काणाडोळा केला जातो.

अलीकडेच देशातील शेतकरी महिन्याला किती रुपये कमवतो, असा प्रश्न संसदेत उपस्थित करण्यात आला. त्यावर केंद्र सरकारकडे शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा आकडा नसल्याचं कृषिमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिलं. खरं म्हणजे शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं आश्वासन देणाऱ्या या सरकारलाच शेतकऱ्यांचं उत्पन्न माहित नाही. मग उत्पन्न दुप्पट करणार कसं?दुसरीकडे शेतकरी फुकटा आहे, आयतखाऊ आहे, अशी आवाई उठवणारे कर चुकवण्यासाठी मात्र शेती उत्पन्नाचा आधार घेत असतात. त्यामुळं सरकारनं शेतकऱ्यांवर कर लावला म्हणजे पटापट बिळातले नागोबा बाहेर येतील आणि शेतकऱ्यांचं वास्तव साऱ्यासमोर येतील.शेतकऱ्याचं मासिक उत्पन्न २०१८ मध्ये १० हजार २१८ रुपये महिना असल्याचं कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं होतं. आत्ताही शेतकऱ्यांचं मासिक उत्पन्न दहा हजार गृहीत धरलं तरी चतुर्थ श्रेणीतील कामगारांपेक्षाही शेतकऱ्यांचं उत्पन्न कमीच ठरतं. अर्थात यामागे सरकारची शेतकरी विरोधी धोरणंच आहेत. शेतकरी चळवळीचे दिवंगत नेते शरद जोशी यांनी शेतीतील उत्पन्नावर आकरला जावा अशी भूमिका मांडली होती. त्यामुळे सरकारनं शेतकऱ्यांकडून आयकर आकारावा म्हणजे शेतकऱ्यांना किती उत्पन्न मिळतं हेही समोर येईल. जेणेकरून 'दूध का दूध और पानी का पानी' होईल.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक जलजीवन दिवस

### महत्वाच्या घटना

१७३९ : नादिरशहाने दिल्ली ताब्यात घेतली
१८८२ : घातक संक्रमक बिमारी 'टीबी' ची ओळख झाली.
१८८८ : इंग्लिश फुटबॉल लीग ची स्थापना झाली होती.
१८९० : भारतीय कलाबाज, जिम्नॅस्ट, बलून वादक, पॅराशूटिस्ट आणि देशभक्त रामचंद्र चटर्जी हे पैराशूट मधून उतरणारे पहिले व्यक्ती बनले.
१९२८ : महाराष्ट्र साहित्य पत्रिकेची सुरुवात झाली
१९३३ : डकाऊ छळछावणीची सुरूवात झाली.
१९४५ : अरब लीगची स्थापना
१९४७ : स्वातंत्र्य भारताचे शेवटील व्हायसरॉय लॉर्ड माउंटबेटन यांचे भारतात आगमन झाले.
१९४९ : जॉर्डन हा देश स्वतंत्र झाला
१९४९ : माध्यमिक शालांत परीक्षेची सुरुवात
१९५४ : अमेरिकेतील मिशीगन शहराच्या साउथफिल्ड भागात पहिला शॉपिंग मॉल उघडण्यात आला.
१९६९ : भारतीय पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड ची स्थापना करण्यात आली.
१९७० : हमीद दलवाई यांनी पुणे येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली.
१९९९ : लता मंगेशकर व भीमसेन जोशी यांना 'पद्मविभूषण'

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९७ : विल्हेल्म (पहिला) जर्मन सम्राट (मृत्यू: ९ मार्च १८८८)
१८६८ : रॉबर्ट मिलिकेन, नोबेल पारितोषिक विजेता, इलेक्ट्रॉनचा शोध, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१८८२ : उर्दू वर्तमानपत्र 'जमाना' चे संस्थापक व समाजसुधारक मुंशी द्यानारायण निगम यांचा जन्मदिन.
१८८५ : भारतीय पुरातत्वशास्त्रज्ञ गुलाम यजदानी, यांचा जन्मदिन.
१८९४ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील प्रभावी क्रांतिकारक सूर्यसेन यांचा जन्मदिन. सूर्यसेन यांनी चटगाव येथील शस्त्रास्त्र हल्ल्याचे नेतृत्व केले होते.
१९२४ : मधुसूदन कालेलकर नाटककार, कथाकार आणि पटकथाकार (मृत्यू: १७ डिसेंबर १९८५)
१९२४ : यूए.एस.ए. टुडे चे स्थापक अल नेउहार्थ यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१३)
१९३० : ख्रिश्चन प्रसारण नेटवर्क चे स्थापक पॅट रॉबर्टसन यांचा जन्म.
१९३१ : बर्टन रिश्टर, नोबेल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१९३३ : इराण चे पहिले अध्यक्ष अबोलहसन बनीसद्र यांचा जन्म.
१९४२ : सर रिचर्ड स्टेफोर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली क्रिप्स मिशन भारतात आले होते.
२००० : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक विजेता भारतीय टेबल टेनिसपटू नैना जयस्वाल यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३२ : योहान वूल्फगाँग गटें जर्मन महाकवी, लेखक, कलाकार आणि राजकारणी. गटें यांनी कालिदासाच्या 'शाकुंतल'चे जर्मनमधे भाषांतर केले होते. (जन्म: २८ ऑगस्ट १७४९)
१९७१ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, साहित्यिक व मासिक संपादक हनुमान प्रसाद पोद्दार यांचे निधन.
१९७७ : भारतीय कम्युनिस्ट नेता तसेच, भारतीय स्वातंत्र्यसेनानी ए. के. गोपालन यांचे निधन.
१९८४ : प्रभाकर आत्माराम पाध्ये लेखक व पत्रकार (जन्म: १९०९)
२००४ : बॅरिस्टर व्ही. एम. तथा 'भाऊसाहेब' तारकुंडे कायदेपंडित, स्वातंत्र्यसैनिक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयात सामाजिक समस्यांसाठी लढा देणारे झुंजार कायदेतज्ञ (जन्म: ३ जुलै १९०९)
२००७ भारतीय तत्वज्ञानी वक्ते यू. जी. कृष्णमूर्ती यांचे निधन.

# मोसंबीचे कीड, रोग व्यवस्थापन कसे करावे

निसर्गतः संत्रा/मोसंबी फळझाडास वर्षातून तीनदा बहार येतो. त्यापैकी पावसाळ्यात (जून-जुलै) येणाऱ्या बहारास ''मृग बहार (मृग नक्षत्रात येणारा) आणि पावसाळा संपल्यानंतर (ऑक्टोबरमध्ये) येणाऱ्या बहारास ''हस्त बहार (हस्त नक्षत्रात येणारा) तर थंडी संपतेवेळी (जानेवारी-फेब्रुवारी) म्हणजे आंब्याला ज्या वेळी बहार येतो तो ''आंबिया बहार असे तीन बहार वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येतात.

ागील काही दिवसांपासून शेतकरी सातत्याने अवकाळी आणि सुलतानी संकटात सापडत आहे. या संकटातून कोणताच शेतकरी वाचताना दिसत नाही. तसंच फळबाग उत्पादक शेतकरी देखील अडचणीत येताना दिसत आहेत. मोसंबी उत्पादक शेतकरी देखील अडचणीत सापडले आहेत. मोसंबीवर सातत्याने मावा, सिल्ला, पाने खाणारी अळी, ढेकूण, डिंक्या अशा रोगांमुळे शेतकरी अडचणीत येतात. फळगळ देखील सातत्याने होत असते. यामुळे आंतरमशागतीची कामे वेळेवर करून तणनियंत्रण करावे. किडींचा प्रादुर्भाव लक्षात घेता सापळे लावावेत, असा सल्ला कृषी अभ्यासक देतात.

किड आणि रोग व्यवस्थापन :

मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट २० मिलीलीटर दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसंच पाने खाणाऱ्या अळीला रोखण्यासाठी क्विनॉलफॉस



२० मिलीलीटर १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. ढेकूणच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २५ मिलीलीटर किंवा डायमेथोएट २० मिलीलीटर १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

आंबिया बहार घेण्याकरिता खताचे नियोजन :

डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून ताणावर सोडल्यानंतर त्वरीत प्रत्येक झाडाला ४० ते ५० किलो शेणखत टाकून आडवी आणि उभी वखरण करावी. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा तापमान वाढताच हलके ओलित करावे. ताण तोडतांना हलक्या ओलिताअगोदर प्रत्येक झाडाला ६०० ग्रॅम नत्र + ४०० ग्रॅम स्फुरद + ४०० पालाश आणि भरखते द्यावीत, त्यानंतर पाच ते सात दिवसांनी दुसरे पाणी (चिंबवणी) द्यावे. तिसऱ्या पाळीला भरपूर पाणी द्यावे. ताण सोडल्यावर २० ते २५ दिवसांनी फुले येतात. त्यानंतर उरलेल्या नत्राचा (अर्धा) हप्ता एक ते दीड महिन्याने किंवा फळे वाटाण्याएवढी झाल्यावर द्यावा. हलक्या जमिनीत नत्राची मात्रा तीन ते चार हप्त्यात विभागून दिल्यास जास्त फायदेशीर ठरते.

# वनस्पतींचे पाने पिवळे पडल्यास केवडा रोगाच्या लागणाची लक्षणे

वनस्पतींची पाने, शिरा व शिरांमधील भाग पिवळा, हिरवट पिवळा अगर केवड्यासारखा पिवळा आढळल्यास त्यांवर केवडा रोग पडला असे म्हणतात. हा रोग कवकजन्य (बुरशीसारख्या हरितद्रव्यरहित सूक्ष्म वनस्पतीमुळे होणारा), व्हायरसजन्य (अतिसूक्ष्म जीवांमुळे होणारा) वा अजीवोपजीवी (दुसऱ्या जीवावर उपजीविका करणाऱ्या जीवांव्यतिरिक्त इतर) कारणांमुळे होतो.

कवकजन्य केवडा रोगामध्ये (डाउनी मिल्ड्यू) पानांच्या वरील बाजूवर पिवळसरपणा आणि त्या जागी खालील बाजूंवर कवकाची किंचित फिकट राखी व फिकट जांभळी लवयुक्त वाढ आढळते. त्यामुळे तो भुरी रोगासारखा भासतो. केवडा रोगामध्ये कवकाची वाढ पानांच्या खालील बाजूवर असते, तर भुरी रोगामध्ये ती पानांच्या दोन्ही बाजूंवर आढळते. कवकाच्या वाढीत बीजाणू (लाक्षणिक प्रजोत्पादक अंग) व बीजाणुधर (बीजाणुधारक भाग) आढळतात. कवक पानाच्या आतील भागातच वाढते. दूषित पानावरील रंग पिवळा अथवा तपकिरी असतो. या रोगामुळे पाने सुकतात आणि निर्जीव बनतात. हा रोग विशेषतः पावसाळ्यात प्रकर्षाने आढळतो. हवेत अथवा मृदेत (जमिनीत) भरपूर आर्द्रता असल्यास या रोगाचा फैलाव त्वरित होतो. शैवल कवक (फायकोमायसीटीज) उपवर्गाच्या पेरोनोस्पोरॅलीझ या गणातील कवकांमुळे हा रोग होतो. प्रमुख पिकांवरील कवकांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

ज्वारी स्क्लेरोस्पोरा सोरघाय; बाजरी, राळा



स्क्ले. ग्रॅमिनीकोला; मका स्क्ले फिलिपीनेन्सिस; नाचणी स्क्ले. मॅक्रोस्पोरा; ऊस स्क्ले. सॅकराय; द्राक्ष प्लॅस्मोपॅरा व्हिटीकोला; काकडी स्युडोपेरोनोस्पोरा क्युबेन्सिस; कांदा पेरोनोस्पोरा डिस्ट्रक्टर; चुका पे. रूमिसीस; कोबी पे. ब्रासिकी; सालीट ब्रिमीया लॅक्टसी. या रोगामुळे पाने सामान्यतः पिवळी पडत असली, तरी काही वेळा रोगामुळे ज्वारी व राळा या पिकांची पाने फाटतात व तंतुमय बनतात. बाजरीची व नाचणीची पाने विटकरी रंगाची दिसतात. बाजरी, राळा व क्वचित ज्वारी यांची कणसे हिरव्या कळ्या फुटल्यासारखी आणि दाणेरहित आढळतात. द्राक्षाची पाने तांबूस बनतात.

मोहोर व देठ कवकाच्या प्रादुर्भावाने जळतात व फळे सुरकुततात. तृणधान्याच्या रोगट पानात कवकाचे संयुक्त बीजाणू (फलन झालेल्या स्त्री-जनन पेशींपासून तयार झालेले बीजाणू) आढळतात. पाने फाटल्याने ते मृदेत पडतात अथवा मळणीच्या वेळी बियांना चिकटतात. त्यामुळे बीजलेपन म्हणून वापरलेल्या एक टक्का पारायुक्त कवकनाशकाचा अत्यल्प उपयोग होतो. म्हणून तृणधान्याचे रोगप्रतिकारक वाण लावतात. द्राक्षे, कांदा आणि काकडीच्या केवडा रोगासाठी झायनेब किंवा ताम्रयुक्त कवकनाशके वापरतात. व्हायरसजन्य केवडा रोगात पाने संपूर्णपणे अथवा बहुतांशी फिकी वा पूर्ण पिवळी पडतात. घेवडा वर्गातील वनस्पतींवर असे रोग आढळतात. भेंडीवरील केवड्यात फक्त शिरा पिवळ्या व क्वचित इतर भाग पिवळा दिसतो. पपई, टोमॅटो, बटाटा, तंबाखू इ. पिकांच्या पानांवर गर्द व फिकट हिरवा रंग आढळतो. प्रकाशात रोगग्रस्त पाने धरल्यास रंगमिश्रिती व विभिन्नता स्पष्ट दिसते. व्हायरसजन्य केवडा रोग पांढरी माशी, मावा, तुडतुडे या कीटकांमुळे फैलावतो. या रोगावर उपाय म्हणजे रोगट वनस्पती उपटून नष्ट करतात, शेतातील तण काढून स्वच्छता ठेवतात व निरोगी वनस्पतींवर कीटकांमार्फत रोग पसरू नये याकरिता कीटकनाशके फवारतात.

अजीवोपजीवी कारणांपैकी काही मूलद्रव्यांच्या उणिवेमुळे केवडा रोग होतो. मोसंबीवर जस्ताच्या आणि उसावर लोहाच्या उणिवेमुळे हा रोग आढळतो. याकरिता कोणते मूलद्रव्य कमी पडले आहे हे शोधून उपाययोजना करतात. पिकांना नायट्रोजन कमी पडल्यानेही पाने पिवळी पडतात. पाणी जरूरीपेक्षा जास्त वा कमी देण्यानेही अशीच लक्षणे आढळतात.


सारांश, केवडा रोग कशामुळे झाला आहे हे शोधून त्यानुसार उपाययोजना केल्यास या रोगाचे निवारण होऊ शकते.

# अळू लागवडीतून मिळेल भरघोस नफा

बाजारात आपल्याला अळूची भाजी हमखास पाहायला मिळते. अळूची भाजी ही तशी दुर्मिळ असते. मात्र, सध्या एकाच भाजीपाल्याची आवक मोठ्या प्रमाणात होऊन, दर घसरणीमुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो. अशावेळी काही शेतकरी राज्यात वेगळा मार्ग निवडत अळूची शेती करताना आढळून येत आहे. विशेष म्हणजे अळूचे आयुर्वेदिक गुणधर्म असल्याने, काही जण अळूच्या भाजीचा प्रकर्षाने आहारात समावेश करतात. याच पार्श्वभूमीवर आज आपण अळू लागवड आणि अळूच्या अधिक उत्पादनक्षम प्रजातीबद्दल जाणून घेणार आहोत

पाणी असल्यास बारमाही पीक : अळू हे जोमाने वाढणारे पीक आहे. अळूच्या पानांचा उपयोग आहारात वडी तयार करून केला जातो. याशिवाय अळूचे कंद उकडून खाल्ले जातात. खरिप हंगामातील अळू लागवड जून-जुलै महिन्यात करतात. तर पाण्याची सोय असल्यास वर्षभर अळूचे पीक घेता येते. प्रामुख्याने कोकण पट्ट्यात अळूचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. तर पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्याने अळू उत्पादन घेण्यात आपले स्थान निर्माण केले आहे.

किती मिळते उत्पादन? साधारणपणे अळूची पाने लागवडीनंतर वाणानुसार चार ते पाच महिन्यात तोडणीला येतात. पूर्ण वाढलेली पाने जमिनीलगत देठासह कापून, गड्ड्या बांधून विक्रीला पाठवावी. पहिल्या वेळी पाने काढल्यानंतर पुन्हा १५ ते १८ दिवसांच्या अंतराने पाने काढणीस तयार होतात. एकदा केलेल्या लागवडीपासून १.५ ते २ वर्षे पाने मिळत राहतात. अळूचे जवळपास ४ ते ५ टन दर



हेक्टरी, हिरवी पाने आणि कंदासाठी लागवण्यात येणार्या जातींपासून सुमारे ६ ते ७ टन दर हेक्टरी कंद एवढे उत्पादन मिळते.

अळूच्या प्रमुख प्रजाती : १) राजेंद्र अळू : राजेंद्र अळू हे वाण कंदांची लागवड केल्यानंतर जवळपास १६० ते १८० दिवसांमध्ये पाने काढणीला येतात. या वाणापासून प्रति हेक्टरी १८० ते २०० क्विंटल उत्पादन मिळते. २) व्हाईट गौरेय्या : व्हाईट गौरेय्या हे अळू वाण लागवडीनंतर) जवळपास १८० ते १९० दिवसांमध्ये पाने तोडणीला येतात. या वाणाच्या लागवडीपासून शेतकऱ्यांना हेक्टरी १७० ते १९० क्विंटल उत्पादन मिळते. ३) पंचमुखी अळू : पंचमुखी अळू हे वाण कंद लागवडीनंतर सुमारे १८० ते २०० दिवसांमध्ये काढणीला येते. ज्यातून हेक्टरी २०० ते २५० क्विंटल इतके हेक्टरी उत्पादन मिळते. ४) मुक्ताकेशी : मुक्ताकेशी हे अळू वाण १६० ते १७० दिवसांमध्ये पाने तोडणीला येतात. या वाणापासून तुम्हाला हेक्टरी २०० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळू शकते. ५) आजाद अळू : आजाद अळू हे वाण केवळ १२० दिवसांमध्ये अर्थात ४ महिन्यांमध्ये काढणीला येते. या वाणापासून हेक्टरी २५० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.

अळूचे आयुर्वेदिक गुणधर्म : अळूची पाने ही जीवनसत्व 'अ'चे मुख्य स्रोत आहेत. ज्यामुळे डोळे निरोगी राहण्यास मदत होते. अळूची पानांमध्ये जीवनसत्व 'क' देखील मोठ्या प्रमाणात आढळते. यामुळे कॅन्सरग्रस्त असलेल्या रुग्णांनी अळूचा आहारात समावेश केल्यास त्यांना अनेक फायदे मिळतात. अळूच्या आहारातील समावेशामुळे कर्करोगाच्या, ट्यूमरच्या वाढीस प्रतिबंध होतो. याशिवाय कर्करोगाच्या पेशींच्या प्रसाराची प्रगती कमी होते. इतकेच नाही तर एका अभ्यासानुसार, अळूची पाने नियमित आहारात समाविष्ट केल्याने कोलन कर्करोगाचे प्रमाण कमी होऊ शकते, असे दिसून आले आहे.

# उन्हाळी भेंडी लागवड तंत्र आणि व्यवस्थापन

उन्हाळी हंगामात घेतले जाणारे भेंडी हे महत्वाचे भाजीपाला पीक आहे. भेंडीच्या फळात कॅल्शिअम व आयोडीन ही मूलद्रव्य आणि क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात. तसेच भेंडी मध्ये केरोटीन पोटॅशिअम मॅग्नेशिअम फॉलिक ॲसिड असे अनेक पौष्टीक घटक आहेत.त्यामुळे बाजारात भेंडीला वर्षभर मागणी असते.त्यामुळे भेंडीचे पीक हे वर्षभर घेतले जाते. भेंडी हे उष्ण व दमट हवामानात येणारे पीक आहे. २० ते ४० अंश.सेल्सिअस तापमान असल्यास बियांची उगवण व झाडांची योग्य वाढ होते व फुलगळ होत नाही.१० अंश सेल्सिअस पेक्षा कमी तापमानाचा उगवणीवर परिणाम होतो.समशीतोष्ण व भरपूर सूर्यप्रकाश असलेले हवामान उपयुक्त.

जमीन : भेंडी पिकाचे पोषण जमिनीच्या वरचे थरातून होत असते म्हणून मध्येम भारी ते काळी कसदार जमीन उपयुक्त, चांगला निचरा होणारी जमीन उत्तम, चोपण क्षारयुक्त व चुनखडी युक्त जमिनीत भेंडीची लागवड टाळावी. वारंवार एकाच जमिनीत भेंडी या पिकाची लागवड करू नये. सामू ६ ते ६.८ पर्यंत व क्षारता ०.२० पेक्षा कमी असणाऱ्या जमिनीत लागवड करावी. पाण्याचा निचरा नसलेल्या जमिनीत वाढ खुंटते व फुलगळ होते.हलक्या जमिनीत सेंद्रिय खताचा वापर करावा.

जाती : अंकुर ४०, पुसा सावनी, महिको १०,परभणी क्रांती, वर्षा, अर्का अनामिका, सिलेक्शन २-२, फुले उत्कर्षा या सुधारित जाती लागवडीस योग्य आहेत.

आंतरमशागत : २-३ वेळा खुरपण्या करून झाडांना भर द्यावी. मजुरांची टंचाई असल्यास बासालींन तणनाशक २-२.५ लिटर ५०० लिटर पाण्यातून पेरणीपूर्वी फवारावे. तणनाशकाची फवारणी करताना जमिनीत पुरेसा ओलावा असावा. तणनाशकाचा फावरणीनंतर ७ दिवसांनी पेरणी करावी. फळे येण्याच्या वेळेस रोपांना भर द्यावी. खत व्यवस्थापन : सेंद्रिय व जिवाणू खते :- शेणखत/कंपोस्ट १५-२० बैलगाडी/एकर गांडूळ खत ४००-५०० किलो प्रति एकर. निंबोळी पेंड ४ गोणी. जिवाणू खत : शेतात टाकणे-रोगप्रक्रिया केली नसल्यास एकरी ३ किलो अँझाटोबॅक्टर व ४ किलो फॉस्फोकल्चर एक बैलगाडी शेणखत मिसळून द्यावे.रासायनिक खते : पेरणीच्या वेळी ५०-५०-५० किलो व्हेक्टर नत्र स्फुरद व पालाश यांची मात्रा जमिनीत मिसळावी व पेरणी नंतर एक महिन्याच्या कालावधीने नत्राचा दुसरा हफ्ता ५० किलो या प्रमाणात द्यावा पेरणी नंतर हलके पाणी द्यावे.त्या नंतर ५ -७ दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

# चऱ्हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वीजजोडणीसाठी १० लाख रुपयांचा निधी

## जलसमाधी आंदोलनाचे यश

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील सराटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्या आठ वर्षापासून पाच कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असून सुरुवातीपासून वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली असून प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे वीजजोडणी साठी निधी देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वात दि.१४ आक्टोबर रोजी च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील साठवण तलावात जलसमाधी आंदोलन करून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांची प्रत्यक्ष भेट घेत निधीची मागणी केली होती.



तेव्हा गांभीर्याने याचा विचार करून लवकरच निधीची उपलब्धता करून देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्याचीच दखल घेत अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांनी च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ईमारत व कर्मचारी निवासस्थान यांच्या विद्युतीकरणा साठी विद्युत रोहित्र ( डी .पी.) बसविणे कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन२०२४- २०२५ अंतर्गत १० लाख रुपयांच्या निधीची तरतूद अग्नि सुरक्षा यंत्रणा खरेदी , दुरूस्ती, विस्तारीकरण व देखभाल , प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र दुरुस्ती व परीक्षण ,पीट बरीयल बांधकाम (लेखाशिर्ष -२२१० ०९४-३१) अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या तरतुदींच्या अंतर्गत करण्यात आली आले.त्यामुळे अखेर वीज जोडणी नंतर रूग्णांची हेळसांड थांबणार असुन बीडला उपचारासाठी लागणार आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही याबद्दल आंदोलनकर्ते व ग्रामस्थांनी सीईओ जिप आदित्य जीवने आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.ऊल्हास गंडाळ यांचे आभार मानले आहेत.

च-हाटा परीसरातील ग्रामस्थांना आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी ५ कोटी रुपये खर्चून ८ वर्षांपूर्वी आरोग्य केंद्र आणि अधिकारी,कर्मचारी निवासस्थाने यासाठी सुसज्ज इमारत बांधण्यात आली होती. मात्र यासाठी सुरूवातीपासूनच वीज जोडणी करण्यात आलीच नाही. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याने रूग्णांना उपचारासाठी बीडला जावे लागते.वीज जोडणी अभावी प्रसुती, शस्त्रक्रिया,आंतररुग्ण विभाग या आरोग्य सुविधा मिळत नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रात असुविधा असल्याने रूग्णांची हेळसांड होत होती. त्यामुळे डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या सह च-हाटा येथील शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,बप्पासाहेब पवार, मनोज तांदळे, सुभाष बांगर, संपत नागरगोजे, सुर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव,भगिरथ उबाळे आदी ग्रामस्थांनी जलसमाधी आंदोलनात भाग घेतला होता. आता वीजजोडणी साठी निधी उपलब्ध झाला असुन लवकरच रूग्णांच्या अडचणी दुर होतील.



# प्राणी मित्रांच्या हल्ल्यासंदर्भात आंदोलनाला सुरुवात!

## राज्यभरातून प्राणी मित्रांचा प्रतिसाद; एसआयटी स्थापन करून चौकशीची मागणी

पाटोदा प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या शिरूर कासार तालुक्यातील भावी येथील ढाकणे पिता पुराना गंभीर मारहाण करून जिवे मारण्याचा प्रसंग घटल्याची घटना राज्य व गाजत असताना बीड सह राज्यभरातील राणी मित्रांनी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलनाला सुरुवात केली आहे राज्यभरातून प्राणिमित्रांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून संबंधितावर खडक कारवाई करून केंद्रीय तपासणी करणे मार्फत तपास करावा अशी मागणी करण्यात येत आहे. बीड जिल्ह्यातील खोक्यांचे प्रकरण राज्यभर गाजत आहे खोक्याच्या माध्यमातून शिरूर तालुक्यात धमाका घातल्या प्रकरणी खोकला अटक करण्यात आली आहे परंतु नंतर त्यांच्या तेवढी कडून आवाज उठवणाऱ्या वर धोका पोहोचू शकतो अशी भीतीही राणी मित्रांनी पोलीस विभागाकडे व्यक्त केलेले आहे.

या पार्श्वभूमीवर आज गुरुवारी मुंबईच्या आझाद मैदानाकडे बीड जिल्ह्यातील प्राणी मित्र दाखल झाले आहेत अन्य जिल्ह्यामधूनही प्राणिमित्र आझाद मैदानावर येत असून माननीय मुख्यमंत्री साहेबांना विनंती करून खोक्यासह पाठीराख्यांना केंद्रीय तपास यंत्रणासाठी आणि सीआयडीच्या मार्फत तपासणी करून कठोर कारवाई करावी यासह अन्य मागण्या संदर्भात हे आंदोलन करण्यात आल्याचे माध्यमांशी बोलताना उपस्थित प्राणी मित्रांनी सांगितले.

दरम्यान, हरीण ससे मोर अशा अन्य प्राण्यांच्या जीवाच्या रक्षणासाठी आणि या प्राण्यांची काळजी घेणाऱ्या राणी मित्रांना न्याय देण्यासाठी शासन आणि प्रशासनाने गंभीर दखल घेऊन संबंधित आरोपी आणि त्याच्या पाठीराख्यावर तपासणी करण्याच्या माध्यमातून तपास करून कठोर कारवाई करावी अशी मागणी राज्यभरातून जोर धरीत आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मंगलताईंना मिळाला आधार

जालना । प्रतिनिधी

मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेला जालना जिल्हा. याच जिल्ह्यातील अंबड तालुक्यात चुरमापुरी हे एक छोटेसे खेडेगाव आहे. चुरमापूरी येथील मंगल रामभाऊ बोडखे ही महिला स्वत:च शेतमजूरी व घरचे काम करत संसाराचा गाडा ओढत असते. श्रीमती बोडखे यांचे शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत झालेले आहे. तसेच पती रामभाऊ बोडखे हे सतत आजारी असल्याने ते गावातच छोटीसी पिठाची गिरणी चालवून आपल्या संसाराला हातभार लावत उदरनिर्वाह करत असतात. त्यांच्या परिवारात त्यांना मुलगा नसून ६ मुलीच आहेत. त्यापैकी ५ मुलींचे लग्न झाले असून त्या त्यांच्या संसारात खुश आहेत. तर सर्वांत लहान मुलगी ही अविवाहीत असून ती सध्या शिक्षण घेत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून महिलांच्या खात्यावर दर महिना १५०० रुपये येणार असल्याची बातमी त्यांना भ्रमणध्वनीद्वारे मिळाली. आजूबाजुच्या सुशिक्षीत महिलांकडून त्यांना वारंवार नारी शक्ती ॲपवर अर्ज केला का मावशी अशी विचारणा होवू लागली. त्यांनी नाही म्हणून सांगितले. त्यानंतर त्यांच्या थेट घरीच अंगणवाडी सेविका पोहचल्या त्यांनी मला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेविषयी सविस्तर माहिती देवून सर्व कागदपत्रे जमवाजमव करण्यास सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी परत घरी येवून अंगणवाडी सेविकेने त्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अर्ज यशस्वीरित्या ऑनलाईन भरला. त्यामुळे अर्ज करतेवेळी प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची अडचण आली नाही व वेळेत अर्ज दाखल झाला असल्याची माहिती त्यांनी दिली. आर्थिक अचडणीच्या काळात पैशांची अत्यंत निकड असतानाच ऑगस्ट महिन्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मंगल रामभाऊ बोडखे यांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाले असल्याचा भ्रमणध्वनीवर संदेश आला असल्याचे त्यांच्या लहान मुलीने त्यांना सांगता क्षणीच त्यांना खुप आनंद झाला. त्याचवेळी प्रथमत: रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाल्याचे ऐकुन बंधूराया मुख्यमंत्री दादा असे शब्द उच्चारत आकाशाकडे पाहून हात जोडत मनापासून आभार मानले. रक्षाबंधनानिमित्त आपणास उत्कृष्ट भेट मिळाली असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त करत गावातील इतरही महिलांना त्यांनी आपल्या खात्यावर पैसे जमा झाल्याची आनंदाने बातमी दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मंगल रामभाऊ बोडखे यांच्या खात्यावर पहिल्याचवेळी ३ हजार रुपये जमा झाले असल्याने त्यांनी या पैशातून गृह उपयोगी साहित्य तसेच किराणा सामानाची खरेदी करत आपल्या उदरनिर्वाहाचा गाडा पुढे चालू ठेवला आहे. या योजनेमुळे त्यांना अत्यंत मोलाची मदत होत असल्याचेही त्यांनी सांगितले. घर, संसारातील निकडीच्या वस्तु, पदार्थ तसेच मुलीचे शिक्षण आणि वारंवार आजारी राहणाऱ्या पतीचा औषधांचा खर्च मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पैशातून त्या करत असल्याचेही त्यांनी सांगितले. मध्यंतरीच्या काळात गावात लाडकी बहीण योजना बंद पडणार अशी अफवा पसरली होती त्यावेळी मनात नुसती बैचेनी सुरु असल्याने फार घुसमट झाली असे सांगून भविष्यातही ही योजना चालू रहावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# अंबडमधील 'त्या' धोकेयदायक मोबाइल टॉवरमुळे नागरिकांच्या जीवाला धोका

## मुख्याधिकाऱ्यांना निवेदन, टॉवर काढून घेण्याची नागरिकांची मागणी

जालना । प्रतिनिधी

अंबड शहरातील नूतन वसाहत येथील निलेश सुभाष मनियार यांच्या घरावर उभारलेल्या मोबाईल टॉवरमुळे नागरिकांच्या जीवाला धोका असून, पशु-पक्षी असुरक्षीत आहेत. तरी सदरील अवैध टॉवर अंबड नगर परिषदेने काढून घ्यावा अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे.

याबाबत अंबड नगर परिषदेचे मुख्याधिकारी मनोज उर्कीडे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, अंबड येथील निलेश मणियार यांनी जुने घर पाडून नवीन बांधकाम सुरू केले. बांधकाम सुरू अतसांना त्यांनी लाईट बील जास्तीचे येते म्हणून सौर पॅनल बसवित असल्याचे खोटे सांगितले. २५ डिसेंबर २०२४ रोजी नाताळाची सुट्टी असल्यामुळे अंबड पालिकेचे अधिकारी-कर्मचारी येणार नाही हे लक्षात घेवून, पहाटे ५ ते सकाळी ८ या वेळेत ८० टक्के टॉवर उभारण्याचे काम पुर्ण केले. कॉलनीतील नागरिकांनी मणियार यांच्या घरी जावून, टॉवरचे काम बंद करा, उद्या नगर परिषदेचे अधिकारी व मुख्याधिकारी आल्यास काम पुर्ण करा, असे सांगितल्यास त्यांनी कोणाचीही विनंती ऐकण्यास नकार दिला व काम चालु ठेवले. व सायंकाळी कॉलनीतील विनंती करणार्या नागरिकांच्या विरोधात पोलिसांकडे तक्रार केली. व राहिलेले टॉवरचे काम पुर्ण केले.

सर्व कॉलनीतील नागरिकांचा या टॉवरला विरोध असून, मोबाईल टॉवर मधुन निघणार्या रेडीएशनचा व इतर दुष्परिणाम नागरिकांच्या आरोग्याचा धोका असल्याने व शेजारीच मत्स्योदरी ज्ञान मंदिर प्रा. शाळा असल्याने सदरील मोबाईल टॉवर सुरू करण्यास परवानगी देवू नये व सदरील टॉवर काढण्याच्या सूचना द्याव्यात व गुन्हा दाखल करावा अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

परंतु याप्रकरणी मुख्याधिकारी व इतर चार ते पाच कर्मचारी चौकशी करण्यासाठी गेले असता त्यांच्यावर घर मालकांनी खोटे आरोप केले असल्याचे काही कर्मचाऱ्याकडून बोलल्या जात आहे. या निवेदनावर नितीन नाथाजी राऊत, विश्वनाथ किसनराव फोके, इंद्रजीत कांबळे, राजु कांबळे, राजु औरंगे, अप्पा औरंगे, अशोक पाठक, बळीराम हर्षे, डॉ. दिपक उगले, अशोक उगले, विष्णुकुमार शेळके, शिवशंकर कापसे, बाबुराव राठोड, भागवत सावंत, गणेश सपकाळ, सी.एस. मेटकर, राधेशाम पवळ, राम शेळके, प्रल्हाद जाधव, पांडुरंग घाटुळ, राजु घाटुळ, अनिल मेहेर, सुनिल मेहेर, एल.डी. कोळकर, अ.ब. गायकवाडु, हारिका बोर्डे, गणेश बोबडे, गणेश दरक, बी.पी.. उगले, भागवत भवर, विक्रांत बाभदे, इंदरराव हर्षे, हरिभाऊ भवर, प्रकाश शेळके, सचिन राजेर, दिपक लोहकरे, उषाताई बिरसाने, सुरेश माळी, अजीत भोजने यांच्यासह नागरिकांच्या सह्या आहेत.

# बालरंगभूमी परिषदेतर्फे आरोग्य शिबिर संपन्न



जालना । प्रतिनिधी

बाल रंगभूमी परिषद जालना शाखेच्या वतीने गुरुवारी ( ता. २०) जिल्हा सामान्य रुग्णालयात आरोग्य शिबिर घेण्यात आले त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डॉ.राजेंद्र पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्धाटन झाले. यावेळी डॉ. राजेंद्र गाडेकर, राजेश राऊत , परिषदेच्या जिल्हाध्यक्षा, अभिनेत्री वैशाली दाभाडे, नरेंद्र माटोले, , यांची उपस्थिती होती शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी रक्तातील साखरेचे प्रमाण,डोळे, मधुमेह, गुडघे, पाठ,मान, पोट,कंबर, पोटाचे विकार, इ. सी. जी. आदी तपासणी करून रुग्णांना मोफत औषधी वितरित करण्यात आली नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी महिला, नागरिकांची उपस्थिती होती.

# दलित तरुणांची हत्या करणाऱ्याला फाशी द्या; पाटोदा तहसिलदार यांना निवेदनाद्वारे मागणी

पाटोदा। प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जामगाव येथील धनु रामू रणसिंग याची पैशाच्या व्यवहारातून व मूळचा जालना जिल्ह्यातील असलेला ट्रकचालक विकास बनसोडे याची जातीय मानसिकतेतून झालेल्या अमानवी हत्येमुळे आज पाटोदा तहसीलदार यांना लहुजी शक्ती सेना , वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग (शरदचंद्र पवार), रिपब्लिकन पँथर व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. राज्यामध्ये अनुसूचित जाती जमातीवरील वाढत असलेल्या अन्याय अत्याचारांमुळे समाजामध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. आष्टी तालुक्यातील जामगाव येथील धनु दामु रामसिंग या वीटभट्टी कामगाराचा व मूळचा जालना जिल्ह्यातील असलेला ट्रकचालक याचे आष्टी तालुक्यातीलच घुमरी पिंपरी येथे झालेले हत्याकांड यामुळे आंबेडकरी समाजामध्ये प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे महाराष्ट्रामधील कायदा आणि सुव्यवस्था नावापुरतीच राहिली असल्याची भावना समाजामध्ये निर्माण झाली आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी व दोन्हींही घटनेमागील इतर मुख्य आरोपी यांना लवकरात लवकर अटक करावी तसेच विकास बनसोडे व धनु रामू रणसिंग यांना शासनाने आर्थिक मदत करावी त्यांच्या कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे ,त्याचप्रमाणे दोन्हीही कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत समाविष्ट करण्यात यावे या मागणीसाठी आंबेडकरी चळवळीतील संघटना व पक्ष यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले. निवेदनावर लहुजी शक्ती सेना पाटोदा तालुकाध्यक्ष क्षिरसागर ,वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड , राहुल शिरोळे वंचित बहुजन आघाडी तालुका उपाध्यक्ष, प्रदीप उबाळे अध्यक्ष रिपब्लिकन पँथर , डॉक्टर सुनील गायकवाड, प्रकाश साठे, ज्ञानदेव लोंढे ग्रामपंचायत सदस्य खडकवाडी, परशुराम गायकवाड ग्रामपंचायत सदस्य सौताडा, रामहरी तुकाराम घुले सरपंच पुत्र ग्रामपंचायत सौताडा, नागेश पाटोळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष आदी पदाधिकाऱ्यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

# आदित्य शिक्षण संस्थेच्या बी कॅम्पसचे वार्षिक स्नेहसंमेलन रंगले १० दिवस

## क्रीडा स्पर्धेसह हॉरर डे, फॅशन डे, माय आयडल, मिस म्याच डे मध्ये विद्यार्थ्यांनी दाखवली चुणूक

बीड। प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेच्या बी कॅम्पस मध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम तब्बल दहा दिवस उत्साहात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संस्कृती कार्यक्रमाबरोबरच वेगवेगळे प्रकारचे डे- हॉरर डे, फॅशन डे, माय आयडल, मिस म्याच डे, साडी, टाय डे, ट्रॅडिशनल डे चे आयोजन करण्यात आले होते. क्रीडा स्पर्धामध्ये कब्बडी, क्रिकेट, गोळा फेक, थाळी फेक, रस्सी खेच, खो खो, हॉलिबॉल. यामध्ये सर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपली चुणूक दाखवली.



> वार्षिक स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी संस्थेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. आदित्य शिक्षण संस्थेत वार्षिक स्नेहसंमेलन हा एक आगळा वेगळा उत्सव असतो. तब्बल दहा दिवस येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. त्याचबरोबर क्रीडा स्पर्धा, वैयक्तिक स्पर्धा, विविध डे असा तब्बल दहा दिवस हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी एक से बढकर एक कलागुण येथे सादर केले. त्यांच्या कलेला आदित्य शिक्षण संस्थेकडून वेळोवेळी स्टेज उपलब्ध करून दिले जाते.
> – डॉ.आदिती सारडा, संचालिका आदित्य शिक्षण संस्था, बीड

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती सी.ए. गिरीश गिल्डा, डॉ. आदिती सारडा (कार्यकारी परिषद सदस्या व. ना. म. कृ. वी. परभणी तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका) यांच्यासह प्राचार्य शाम भुतडा(आदित्य कृषि महाविद्यालय बीड), डॉ. आपेट (आदित्य अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय ,बीड) डॉ. सतीश कचरे (आदित्य कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय बीड), डॉ. हिमांशू श्रीवास्तव(आदित्य दंत महाविद्यालय ,बीड) डॉ. विवेक कुलकर्णी (आदित्य आयुर्वेद महाविद्यालय, बीड) डॉ. अमोल सानप, आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालय बीड, डॉ. विकास गर्जे आदित्य नर्सिंग महाविद्यालय , बीडबालाजी बहिरवाल आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालय यांची प्रमुख उपस्थिती होती हा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आदित्य शिक्षण संस्था बी कॅम्पस येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला कार्यक्रमाचे उद्घाटन सी .ए. गिरीशजी गिल्डा यांच्या हस्ते झाला यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वार्षिक स्नेहसंमेलनात आदित्य शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयातील तब्बल दोन हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. हा कार्यक्रम संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्याम भुतडा आदित्य कृषी महाविद्यालय बीड यांनी केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध गुणदर्शन कार्यक्रम उपयुक्त ठरतात. पुस्तकी अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी विविध कला, चांगले छंद जोपासावेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम आदित्य शिक्षण संस्था बीड तत्पर असते. असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - आम्रपाली गायकवाड आणि श्रावणी खेरणार यांनी केलं. प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आभार प्राचार्य शाम भूतडा यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# बीड शहरातील गयानगर परिसरात शिवमहापुराण कथेस प्रारंभ



बीड। प्रतिनिधी

शहरातील गयानगर परिसरातील जैन मंदिराच्या मागील कॉलनीमध्ये शुक्रवार (दि. २१) पासून सात दिवस शिवमहापुराण कथेस प्रारंभ झाला आहे. ही कथा सात दिवस चालणार असून २७ मार्च रोजी कथेची सांगता ग्रंथ मिरवणुक आणि महाप्रसादाने होणार आहे.

शहरातील गयानगर परिसरातील जैन मंदिराच्या मागील कॉलनीमधील शोभा हनुमंतराव पिंपळे आणि छाया पांडुरंग वैद्य यांनी या शिवमहापुराण कथेचे आयोजन केले आहे. शुक्रवारी (दि. २१) रोजी कथा कार्यक्रमस्थळी नऊग्रह स्थापना, कलश स्थपना पुजा रवी सुरेश उबाळे आणि प्रतिभा रवी उबाळे यांच्या हस्ते आरती करुन शिवाजी माराज पवार-मांजरसुंबा यांनी शिवमहापुराण कथेस प्रारंभ केला.

दि. २१ ते २७ मार्च दरम्यान दररोज दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शिवमहापुराण कथा शिवाजी माराज पवार सांगणार आहेत. त्यांना विजय महाराज जाधव- आळंदी, भीमराव महाराज डुबल, नकुल महाराज मोरे यांची साथसंगत मिळणार आहे. गयानगर परिसरातील जैन मंदिराच्या मागील कॉलनीमध्ये शिवमहापुराण कथेचा लाभ भावविकांनी घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# वन्य प्राणी मित्रांच्या हल्ल्यासंदर्भात मुंबईच्या मैदानावरील आंदोलनाला सुरुवात!

## राज्यभरातून प्राणी मित्रांचा प्रतिसाद; एसआयटी स्थापन करून चौकशीची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याच्या शिरूर कासार तालुक्यातील भावी येथील ढाकणे पिता पुराना गंभीर मारहाण करून जिवे मारण्याचा प्रसंग घटल्याची घटना राज्य व गाजत असताना बीड सह राज्यभरातील राणी मित्रांनी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलनाला सुरुवात केली आहे राज्यभरातून प्राणिमित्रांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून संबंधितावर खडक कारवाई करून केंद्रीय तपासणी करणे मार्फत तपास करावा अशी मागणी करण्यात येत आहे.**

बीड जिल्ह्यातील खोक्यांचे प्रकरण राज्यभर गाजत आहे खोक्याच्या माध्यमातून शिरूर तालुक्यात धमाका घातल्या प्रकरणी खोकला अटक करण्यात आली आहे परंतु नंतर त्यांच्या तेवढी कडून आवाज उठवणाऱ्या वर धोका पोहोचू शकतो अशी भीतीही राणी मित्रांनी पोलीस विभागाकडे व्यक्त केलेले आहे.या पार्श्वभूमीवर आज गुरुवारी मुंबईच्या आझाद मैदानाकडे बीड जिल्ह्यातील प्राणी मित्र दाखल झाले आहेत अन्य जिल्ह्यामधूनही प्राणिमित्र आझाद मैदानावर येत असून माननीय मुख्यमंत्री साहेबांना विनंती करून खोक्यासह पाठीराख्यांना केंद्रीय तपास यंत्रणासाठी आणि सीआयडीच्या मार्फत तपासणी करून कठोर कारवाई करावी यासह अन्य मागण्या संदर्भात हे आंदोलन करण्यात आल्याचे माध्यमांशी बोलताना उपस्थित प्राणी मित्रांनी सांगितले.दरम्यान, हरीण ससे मोर अशा अन्य प्राण्यांच्या जीवाच्या रक्षणासाठी आणि या प्राण्यांची काळजी घेणाऱ्या राणी मित्रांना न्याय देण्यासाठी शासन आणि प्रशासनाने गंभीर दखल घेऊन संबंधित आरोपी आणि त्याच्या पाठीराख्यावर तपासणी करण्याच्या माध्यमातून तपास करून कठोर कारवाई करावी अशी मागणी राज्यभरातून जोर धरीत आहे.



### बिश्नोई समाजाने घेतली खोक्याने मारलेल्या हरणाची दखल!

शासनाने कारवाई न केल्यास बिस्नोई समाज खोक्यावर कारवाई करणार असल्याचीही चर्चा मोठ्या प्रमाणावर माध्यमातून दिसून येत आहे.बीड जिल्ह्यातील खोक्या उर्फ सतीश भोसले ने आज पर्यंत शेकडो हरीण मारल्याच्या आरोपवरून, आझाद मैदान, मुंबई येथे हजारो वन्यजीव प्रेमी उपोषणास बसले आहेत. आणि कार्यवाही ची मागणी करत आहेत.ही बातमी राजस्थानमधील जोधपूरच्या बिस्णोई समजला मिळाली असता, बिस्णोई समाजाचे एक शिष्टमंडळ, उपोषणास्थळी येऊन भेटले, सरकारने योग्य ती कार्यवाही नाही केली तर आम्ही जे काय करायचे ते करू असा कडक इशारा दिला असल्याचे समाज माध्यमातून दिसून येत आहे.

## चौसाळा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा शुभारंभ

चौसाळा । प्रतिनिधी

अनेक दिवसापासून चौसाळा येथे नॅशनल बँकेची दुसरी शाखा असावी अशी मागणी होती त्यां मागणीनुसार चौसाळा ता. जि. बीड येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेची शाखा शुभारंभ मा.जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक यांच्या शुभ हस्ते दिनांक २० ०३ २०२५ रोजी संपन्न झाला मा. जिल्हाधिकारी पाठक साहेब यांनी आपल्या भाषणातून सध्याचे युग हेऑनलाइन चे आहे अनेक नागरिक आपले व्यवहारऑनलाइन द्वारेच करतात ही एक चांगली बाब आहे सर्व नागरिकांनी विशेषता शेतकऱ्यांनी आपले खाते नॅशनल बँकेतून काढून विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी सदर बँकेत खाते असणे आवश्यक आहे. असे सुचविले या शुभारंभ कार्यक्रम कार्यक्रमाला बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक शिवशंकर कावेरी बँकेचे व्यवस्थापक किरण कुमार



साळुंखे अधिकारी बँकेचे कृषी अधिकारी गजानन सानपयांच्यासह गावातील सर्व नागरिक सरपंचन विविध क्षेत्रातील मान्यवर व पत्रकारहे उपस्थित होते या कार्यक्रमा नंतर माननीय जिल्हाधिकारी पाठक साहेब चौसाळा आले असता एका छोटेखानी कार्यक्रमात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला गावातील सरपंचपती बाबुशेठ लोढा उपसरपंचअंकुश राव कळासे सामाजिक कार्यकर्ते मोहन झोडगे व तागड आदींनी पाठक यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी बीडचे तहसीलदार श्री शेळके साहेब व मंडल अधिकारी जायभाय साहेब तलाठी निर्मळ साहेब व पत्रकार एनटी वाघमारे विकास सर्वज्ञ आदी नागरिक उपस्थित होते

## अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली अमोल कोरडे यांचा शिवसेनेत प्रवेश



बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन अमोल कोरडे मा.अध्यक्ष एसटी कामगार सेना बीड यांनी काल रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली उबाठा गटातून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन यांनी अमोल कोरडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत शिवसेनेत स्वागत केले. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर याबरोबरच शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, तथा शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## जिल्ह्यातील १९,१४६ असाक्षर देणार पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत जिल्ह्यातील १९१४६ असाक्षर (वाचन, लेखन व संख्यात्मक) मूल्यमापन चाचणी देणार आहेत. प्रत्यक्ष पेपरचा कालावधी ३ तासांचा असेल ( दिव्यांगव्यक्तींसाठी ६० मिनिटे जादा वेळ) संबंधित शाळेचे मुख्याध्यापक अथवा मुख्याध्यापकांनी निर्देशित केलेले त्याच शाळेतील सेवाजेष्ठ शिक्षक हे परीक्षा केंद्र संचालक असतील. केंद्र पुरस्कृत उल्लास नव साक्षरता कार्यक्रमांतर्गत बीड जिल्ह्यात २०२२-२३ते २०२६ २७ या कालावधीत मा. श्री. अविनाश पाठक, जिल्हाधिकारी व मा. श्री. आदित्य जीवने, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात राबवला जात आहे. जिल्ह्यातील १५ वर्षे व त्याहून अधिक वयोगटातील असाक्षर व्यक्ती मध्येपायाभूत साक्षरता वाचन लेखन व संख्याज्ञान विकसित करून त्यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण जीवन कौशल्य विकसित करावयाची आहेत. या कौशल्या मध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य,आरोग्याची काळजी व जागरूकता, बाल संगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण इत्यादी बाबींचा समावेश आहे.बीड जिल्ह्यातील तालुकानिहाय परीक्षा देणाऱ्या असाक्षर यांची संख्यातालुका निहाय असाक्षर संख्या तालुका अंबाजोगाई १७४८, आष्टी २४८६ ,बीड ३१५३ , धारूर ८१२, गेवराई २०३४ , केज ९८७, माजलगांव १७७०, परळी २८२७, पाटोदा ११८० ,शिरुर का .१३२२ , वडवणी ८२७ एकुण असाक्षर संख्या १९१४६ अशी आहे.

ज्या असाक्षरांची उल्लास ॲपवर अद्याप नोंदणी झालेली नाही त्यांनाही परीक्षेच्या दिवशी ऑफलाईन नोंदणी करुन परीक्षा देता येईल. असाक्षर नोंदणी करण्यासाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना संपर्क करावा. अशी माहिती शिक्षण विभाग योजना यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यातील १००% टक्के असाक्षरांना सदर परीक्षेस उपस्थित ठेवून परीक्षा घेण्याचे आवाहन सर्व शाळांच्या मुख्याध्यापक यांना श्री. नदाफ प्राचार्य डायट अंबाजोगाई, श्री. भगवान फुलारी शिक्षणाधिकारी (प्रा), श्री. नागनाथशिंदे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व श्री. संजय पंचगल्ले शिक्षणाधिकारी (योजना) यांनी आवाहन केले आहे.

## कामगाराची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर

**वडवणी । प्रतिनिधी**

आज दिनांक २१/ ०३ / २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ९.वा .राम मंदिर चौक वडवणी येथे ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी व भाजपा कामगार मोर्चा वडवणी तालुका च्या वतीने महाराष्ट्र कामगार व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणी कृत कामगाराची मोफत रक्त तपासणी व आरोग्य तपासणी औषधोपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते.यावेळी महिला व पुरुष कामगाराची रक्त व आरोग्य तपासणी व्यवस्थापक अधिकारी प्रदुमन पाथरकर, सेवा समन्वयक गोविंद उदांवत ,डॉ.मनीषा महाजन,शरद पेरके, रोहीणी चिंचकर , एकनाथ जाधव,



शीतल भोसले, अभिजित थेटे, यांनी कामगाराची रक्त तपासणी व आरोग्य तपासणी करून औषधोपचार देण्यात यावे आले.

रक्त तपासणी केल्यानंतर आपलेला मिळणारे फायदे

✻ तपासणी ते उपचार✻✻

सदर शिबीराचे मिळणाऱ्या खालील प्रकाराच्या आजारांवर उपचार डेंग्यू, मलेरिया , अशक्तपणा, सर्दी, खोकला, सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया हाडाची शस्त्रक्रिया,डोळयांची शस्त्रक्रिया,हर्णिया, किडनी स्टोन, सिझन,नॉर्मन डिलिव्हरी,मुळव्याध, फॅमिली प्लॅनिंग,व इतर या सर्व योजना बांधकाम कामगार व कुटूंबातील व्यक्ती साठी आहे. दीप हॉस्पिटल बीड, लाईफ लाईन हॉस्पिटल बीड, यशवंतराव जाधव हॉस्पिटल बीड, शिवाजीराव डायग्रोस्टिक बीड.व इतर हॉस्पिटल मध्ये कामगारांना मोफत औषधोपचार मिळणार आहेत. यावेळी जास्तीत जास्त नोंदणीकृत कामगारांनी आरोग्य तपासणी चा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका अध्यक्ष शंकर झाडे यांने केले आहे. यावेळी ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी तालुका अध्यक्ष शंकर झाडे, जिल्हा सहसंघटक गणेश दादा टकले, संघटक गणेश म्हेत्रे, सहसचिव नारायण जाधव, हरिदास टकले,डिगांबर म्हेत्रे, गणेश दिंडकर, गणेश गुगळे,ज्योतीराम लोकरे, उपस्थित होते.

## तलाव उशाला कोरड घशाला ?

### जलजीवनचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप; गावातील महिला आक्रमक

### गावकऱ्यांच्या पाण्यासाठी भागवतचे आमरण उपोषण

### तब्येत खालावली , उपचार घेण्यास नकार !

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथे जलजीवन योजनेच्या कामासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. दोन वर्षापासून हे काम सुरू असून हे काम अजूनही प्रलंबित आहे. त्यामुळे उन्हाळ्यात या जीवाचीवाडी ग्रामस्थांना पाणी मिळणार नाही,



त्यामुळे गावातील एक सामाजिक कार्य तत्पर असणारा तरुण भागवत चौरे. याने अमरण उपोषणाचा हत्यार उपसला आहे. संबंधित प्रशासनाकडून या उपोषणास दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. तलाव उशाला कोरड घशाला असा आता जीवाचीवाडी ग्रामस्थांचा झाला आहे. संबंधित



गुत्तेदारावर कारवाई व्हावी. लवकरच या जलजीवन मिशनचे योग्यरित्या काम होऊन ग्रामस्थांना पाणी मिळावं यासाठी या मागणी घेऊन भागवत चौरे यांनी अमरण उपोषण गावातील हनुमान मंदिर येथे सुरू केला आहे. उपोषणाचा दुसरा दिवस असून भागवत चौरे यांची तब्येत खालावली आहे . त्यांनी डॉक्टरांच्या तपासणी नुसार त्यांनी इलाज करण्यापासून नकार दिला आहे.

## अखेर सायमाला आधार कार्ड मिळाले पोस्टमास्तर विनोद गर्जे यांची शिष्टाई फळाला

### शासकीय पातळीवर सायमाचे अस्तित्व झाले सिध्द

**पाटोदा । प्रतिनिधी**

सध्याच्या युगात एखाद्याचा आधार नंबर नसने म्हणजे त्याच्या अस्तित्वावरच प्रश्न चिन्ह निर्माण होते. असच काहीसं गेल्या ९ वर्षांपासून उपचाराअभावी अंपगत्व आलेल्या सायमा सोबत घडल असुन पाटोदा पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर श्री.विनोद पोपट गर्जे यांची शिष्टाई फळाला आली असुन अखेर सायमाला आधार नंबर मिळाला आहे.

अनावधानाने घडलेल्या अपघातात गंभीर जखमी



झालेल्या सायमाला योग्य उपचार न मिळाल्याने अंपगत्व आले असुन गेल्या ९ वर्षापासून ती अंथरुणावर पडुन होती ही गंभीर बाब जेव्हा सय्यद शफावोद्दीन, पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांच्या निर्दनाश आल्यानंतर त्यांनी लोकसहभागाचे आवाहन केले होते.त्यामुळे अनेक दानशूरांनी स्वतःहुन पुढे येत सढळ हाताने मदत सुरू केली असुन ती अविरतपणे सुरू

### काम म्हणजे माझ्यासाठी पर्वणी कायमच सेवा देण्याचा प्रयत्न-गर्जे

**मी स्वतः पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावचा असुन पाटोदा शहरातील तथा तालुक्यातील ग्राहकाचे कामं म्हणजें माझ्यासाठी पर्वणी समजून कायमच सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे आणि भविष्यात करणार. सायमा हिला आम्ही काहीतरी मदत करू शकलो हे माझं भाग्य, ईश्वर, अल्लाह त्यांना लवकरं त्यांचा पायावर उभं करेल अशी प्रार्थना करतो., विनोद पोपट गर्जे,पोस्टमास्तर, पाटोदा**

असुन त्यातुनच सायमावर उपचार सुरू आहेत.मात्र शासकीय पातळीवर तिचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी महत्वपूर्ण मानले जाणारे आधार कार्ड नसल्याने मोठी अडचण येत होती. तिच्या कुटुंबीयांनी अनेकदा आधार कार्ड काढण्याचा प्रयत्न केला होता मात्र अपयश येत होते.हि गंभीर घटनेकडे पाटोदा पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर श्री. विनोद गर्जे यांना सय्यद ◂◂ पान ३ वर

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने महाड क्रांती दिन साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्व अंतर्गत तालुका शाखा माजलगावच्या वतीन दि.२० मार्च गुरुवार रोजी सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह क्रांती दिन म्हणून साजरा करण्यात आला.**

या कार्यक्रमाची शुरुवात धम्म वंदनेने करण्यात आली तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष बौद्धचार्य आयु. वाघमारे हे होते तर मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हा अध्यक्षा आयु. कमलताई डोंगरे,जिल्हा संस्कार उपाध्यक्ष आयु.एस.बी.मोरे, जिल्हा संस्कार सचिव शाम वाघमारे




यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे संस्कार उपाध्यक्ष आयु.गुलाब धाईजे यांनी केले तर सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस आयु. सिध्दार्थ वक्ते यांनी केले. आभार आयु. शारदाताई तांगडे यांनी मानले. कार्यक्रमास जिल्हा संस्कार उपाध्यक्षा आद.लिलाताई उजगरे ,जिल्हा पर्यटन सचिव आयु. एन.बी.राजभोज जिल्हा संघटक आयु. बी.सी.डोंगरे, तालुका संरक्षण उपाध्यक्ष नितिन डोंगरे,तालुका संरक्षण सचिव भगवान डोंगरे,शरद उजगरे,तालुका पदाधिकारी यांच्या सह धम्म उपासक उपासिका उपस्थित होते.शेवटी शरणंतय घेऊन कार्यक्रम संपन्न झाला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शहरात भांगयुक्त बंटा गोळ्यांची विक्री, एकाला अटक

**पुणे । प्रतिनिधी**



शहरात काही सोसायट्या, वस्त्या आणि शाळा- महाविद्यालयांच्या परिसरात भांगयुक्त बंटा गोळ्यांची विक्री केली जात आहे. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने शिवणे परिसरात छापा टाकून बंटा गोळ्या विक्री करणाऱ्या तरुणाला अटक केली.

दिनेश मोहनलाल चौधरी (वय ३०, रा. राधाकृष्ण, अर्पाटमेंट, देशमुखवाडी, शिवणे, पुणे) असे गुन्हा दाखल केलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नशा करण्यासाठी भांगयुक्त बंटा गोळ्यांची विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे, सहाय्यक आयुक्त गणेश इंगळे यांनी अमली पदार्थ विरोधी पथकाला कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार या पथकाने शिवणे येथील देशमुखवाडी कॅनॉल रस्ता परिसरातील एका किराणा दुकानात छापा टाकला.

दिनेश चौधरी याचा ताब्यातून ११ हजार रुपये किमतीच्या नायलॉन पोत्यामध्ये भांगयुक्त बंटा गोळ्या असलेले २४ पाकिटे जप्त केली. प्रत्येक पाकिटाचे वजन २०० ग्रॅम असा चार किलो ८०० ग्रॅम वजनाच्या बंटा गोळ्या जप्त केल्या. त्याच्यावर उत्तमनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चौधरी हा मूळचा राजस्थान राज्यातील असून, पुणे शहरात गेल्या पाच वर्षांपासून किराणा मालाचे दुकान चालवत आहे. त्याने भांगयुक्त बंटा गोळ्या कोठून आणल्या, कोठे विक्री करीत होता याबाबत पोलिस अधिक तपास करीत आहेत.

अमली पदार्थ विरोधी पथक एकचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक उल्हास कदम, सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिकेत पोटे, पोलिस उपनिरीक्षक दिगंबर कोकाटे, पोलिस अंमलदार, सचिन माळवे, संदीप शिर्के, विपिन गायकवाड, विशाल दळवी, मारुती पारधी, संदेश काकडे, दत्ताराम जाधव, योगेश मोहिते यांनी ही कारवाई केली.

# श्री भैरवनाथ व जोगेश्वरी माता यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन

**ओझर । प्रतिनिधी**



शिरोली बुद्रुक गावचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ व जोगेश्वरी माता यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री भैरवनाथ अखंड हरिनाम सप्ताह मंडळ व समस्त ग्रामस्थ मंडळी यांनी दिली.

अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ६० वर्ष असून त्या अनुषंगाने पंच तपपूर्ती सोहळा साजरा केला जात आहे. या सप्ताहाचा प्रारंभ शनिवार दि २२ रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत वि. सह. सा. का. अध्यक्ष सत्यशील शेरकर, रायगडचे अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांच्या उपस्थितीत तसेच ह. भ. प. मुरलीधर भाऊ थोरवे यांच्या शुभहस्ते विना पूजन करून होणार आहे.

सप्ताहाच्या पहिल्या दिवशी निवृत्ती महाराज देशमुख यांचे कीर्तन होणार असून सप्ताह कालखंडात ह. भ. प. सुदाम महाराज पानेगावकर, अमृताश्रम स्वामी महाराज विशाल महाराज खोले, प्रकाश महाराज जवंजाळ तुकाराम महाराज मुंढे शास्त्री, अक्रूर महाराज साखरे, यांचे कीर्तन होणार असून शनिवार दि. २९ मार्च रोजी ह. भ. प. समाधानजी महाराज शर्मा, बीड यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसाद वाटप होऊन सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताह कालखंडात पहाटे ४ ते ६ काकडा, ७ ते १० ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, सायं ५ ते ६ हरिपाठ तर कीर्तननंतर हनुमान भजन मंडळ नेतवड, भुवनेश्वर प्रासादिक भजन मंडळ, आलमे, हनुमान प्रासादिक भजन मंडळ, धालेवाडी, मार्तंड भजन मंडळ, तेजेवाडी, अंबिका भजन मंडळ, शिंदे मळा शिरोली बुद्रुक, मुक्तादेवी भजन मंडळ आलमे, अमृतनाथ स्वामी भजनी मंडळ निरगुडे यांचा जागर होणार आहे. दरम्यान, दि. ३० मार्च रोजी यात्रेनिमित्त भिका भीमा सांगवीकर यांच्या लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले असून दि. ३१ रोजी सायंकाळी ५ वाजता कुस्तीच्या आखाडच्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १ एप्रिल रोजी श्री दावल मालिक बाबा यात्रा उत्सव साजरा केला जाणारा असून मांडव डहाळे मिरवणूक व अन्नप्रसाद तर रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होऊन यात्रेची सांगता होणार आहे.

# बापच बनला पोटच्या मुलाचा कर्दनकाळ! ३ वर्षीय चिमुकल्याची बापाने केली निर्घृण हत्या

**पुणे । प्रतिनिधी**

पत्नीसोबत झालेल्या भांडणाचा राग आनावर झाल्याने बापाने रागाच्या भारात आपल्या पोटच्या मुलाचा खून केल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली आहे. हत्येनंतर त्याने मुलाचा मृतदेह जंगलात फेकून दिला. हिम्मत माधव टीकेटी असे हत्या झालेल्या चिमुकल्याचे नाव आहे. याप्रकरणी माधव टीकेटी याच्यावर चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत अधिक माहिती अशी, पुण्यातील चंदननगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारा आयटी इंजिनियर माधव टीकेटी हा पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत होता. यामुळे त्यांच्यात नेहमी वाद होत होते. दरम्यान त्यांच्यात झालेल्या जोरदार भांडणाचा राग मनात धरून त्याने आपल्या पोटच्या मुलाचा खून केला. व त्यानंतर त्याने त्याचा मृतदेह जंगलात फेकून दिला. धक्कादायक बाब म्हणजे त्याने मुलाचा खून केल्यानंतर पोलिसांत धाव घेत मुलगा बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांकडून याप्रकरणी तपास सुरू होता. यादरम्यान माधव टीकेटी आणि त्याच्या पत्नीचे नेहमी वाद होत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. त्यामुळे पोलिसांचा त्याच्यावर संशय बळावला. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेत कसून चौकशी केली असता पत्नीशी वारंवार होत असल्याच्या भांडणाच्या रागातून आपणच मुलाचा खून केल्याची कबुली त्याने पोलिसांना दिली. याप्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# पुण्यात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा कारागृहाच्या शेजारील प्रेसच्या जागेत असलेल्या जुन्या बंगल्यात एका १८ वर्षीय मुलाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. दरम्यान, तरुणाने आत्महत्या का केली हे समजू शकलेले नाही. साहिल विलास कांबळे (वय १८, रा. धानोरी, विश्रांतवाडी) असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, पंचशील नगर परिसरात राज्यातील सर्वात मोठे येरवडा कारागृह आहे. कारागृहाच्या शेजारीच प्रिटींग प्रेस आहे. कारागृह विभागाचीच प्रेस आहे. दरम्यान, या जागेतील जुन्या व पडलेल्या बंगल्यात एका मुलाने गळफास घेतल्याचे दिसून आले. ही माहिती पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानूसार, घटनेची माहिती येरवडा पोलिसांना देण्यात आली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. तेव्हा १८ वर्षीय साहिल कांबळे याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्याचा मृतदेह ससून रुग्णालयात पाठविला आहे. घटनेची नोंद घेतली असून, तपास सुरू केला आहे. मुलाच्या अंगावर जखमी किंवा असे काही आढळलेले नाही. संशयास्पद आढळलेले नसून, मुलाच्या वडिलांकडे प्राथमिक चौकशी केल्याचे येरवडा पोलिसांनी सांगितले.

# शिक्षण संस्थाचालकाला २५ लाखांची खंडणी मागणाऱ्यास अटक; आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी

**पुणे । प्रतिनिधी**

नामांकित शिक्षण संस्थाचालकास त्यांच्या मुलाचे आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी देऊन २५ लाखांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. दरम्यान, सिंहगड रस्ता पोलिसांनी खंडणी मागणाऱ्यास पाच तासांच्या आत अटक केली.

याबाबत संबंधित संस्थाचालक (रा. मानाजीनगर, नऱ्हे) यांनी सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून सुदर्शन कांबळे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कांबळे हा पाच वर्षांपूर्वी या शिक्षण संस्थेत कॅमेरामन आणि संगणक तंत्रज्ञ म्हणून कामास होता.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड रस्ता परिसरात नामांकित शिक्षण संस्था आहे. आरोपी कांबळे सहा मार्च रोजी शिक्षण संस्थेच्या आवारात आला. तसेच, त्याने शिक्षण संस्थाचालकाच्या मोबाईलवर संदेश पाठविला. 'माझ्याकडे तुमच्या मुलाचे संस्थेतील महिला कर्मचाऱ्यासमवेत आक्षेपार्ह व्हिडिओ आहेत. २५ लाख रुपये न दिल्यास ते व्हिडिओ समाज माध्यमावर प्रसारित करू,' अशी धमकी दिली. याबाबत २० मार्च रोजी तक्रार प्राप्त झाल्यानंतर सिंहगड रस्ता पोलिसांनी कांबळे याच्यावर गुन्हा दाखल केला.


वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप दाईंगडे यांनी तपास पथकाला आरोपीचा शोध घेण्याबाबत सूचना दिल्या. पोलिसांनी आरोपी कांबळेला त्याच्या धायरेश्वर मंदिराजवळील घराच्या परिसरातून अटक केली. सहाय्यक पोलिस आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक दिलीप दाईंगडे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) उत्तम भजनावळे, सहाय्यक निरीक्षक समीर चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक सुरेश जायभाय, संतोष भांडवलकर, सागर पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# स्वारगेट बलात्कार पीडितेचा आवाज बाहेर का ऐकू आला नाही ? पोलिसांना मिळाला सर्वात मोठा खुलासा

**पुणे । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली होती, पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात उभ्या असलेल्या एका बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार करण्यात आला. या घटनेनं राज्यभरात खळबळ उडाली होती. दत्ता गाडे असं या प्रकरणातील आरोपीचं नाव आहे. त्याने स्वारगेटमध्ये उभ्या असलेल्या बसमध्ये पीडितेवर बलात्कार केला. या घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. त्याला त्याच्याच गावातून पोलिसांनी अटक केली, सध्या तो कोठडीमध्ये आहे. दरम्यान या प्रकरणात आता महत्त्वाची माहिती समोर आली आहे. जेव्हा घटना घडली तेव्हा पीडितेनं आरडा-ओरड केली, मात्र तिचा आवाज कसा ऐकू आला नाही? असा सवाल उपस्थित करण्यात येत होता. याबाबत आता मोठा खुलासा समोर आला आहे.





या प्रकरणात पोलिसांकडून ज्या बसमध्ये ही घटना घडली होती तिची शास्त्रोक्त तपासणी करण्यात आली आहे. ज्या बसमध्ये ही घटना घडली त्या बसमधून आवाज बाहेर येतो की नाही याची शास्त्रोक्त पडताळणी पोलिसांनी केली. यातून एक धक्कादायक बाब समोर आली आहे. अत्याचारावेळी तरुणीने आरोपीला प्रतिकार केला. मोठ्याने आरडाओरडा करून मदत मिळवण्यासाठी प्रयत्न केला, मात्र बस वातानुकूलित असल्याने काचा बंद होत्या, त्यामुळे आवाज बाहेर ऐकू आला नाही. असं पोलीस तपासात समोर आलं आहे. आरोपीविरोधात भक्कम पुरावे जमा करण्यासाठी पोलिसांकडून या बसची पुन्हा एकदा तपासणी करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात उभ्या असलेल्या एका बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली होती. बसमध्ये आरोपीने तरुणीवर बलात्कार केला. दत्ता गाडे असं या प्रकरणातील आरोपीचं नाव असून, तो पुणे जिल्ह्यातल्या शिरूर तालुक्यातील गुणा गावचा रहिवाशी आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. तो त्याच्या मुळगावी लपून बसल्याचा पोलिसांना सशंय होता. पोलिसांनी त्याला त्याच्याच गावातून अटक केली. पीडितेवर दोनदा अत्याचार झाल्याचं मेडिकल रिपोर्टमधून समोर आलं आहे. सध्या या प्रकरणातील आरोपी कोठडीत आहे.

# डीजे न लावता अनोख्या पद्धतीने साजरी केली शिवजयंती, महिला भगिनींना बक्षिसांची खास मेजवानी

**विश्रांतवाडी । प्रतिनिधी**

भैरवनगरमधील श्री गणेश मित्र मंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती डीजेच्या कर्णकर्कश आवाजात धांगडधिंगा न करता अनोख्या पद्धतीने साजरी केली. महाराजांची जयंती व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून खास महिला भगीनींसाठी सुप्रसिद्ध निवेदिका पूजा काळभोर प्रस्तुत न्यू होम मिनिस्टर अर्थात खेळ रंगला. पैठणीचा या मनोरंजनात्मक व प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमातील विविध खेळात उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन महिला भगिनींनी आनंद लुटला. अनोख्या मनोरंजनात्मक कार्यक्रमाच्या आयोजनामुळे धानोरी, टिंगरेनगर, कळस, लोहगाव व विश्रांतवाडी परिसरात मंडळाच्या कार्यकर्त्यांचे कौतुक होत आहे.



युवानेते विशाल टिंगरे व युवा उद्योजक अतुल टिंगरे यांच्या विशेष सहकार्यातून कार्यक्रम पार पडला. न्यू होम मिनिस्टर - खेळ रंगला पैठणीचा या कार्यक्रमातून खास मेजवानी मिळाल्याचा आनंद प्रत्येक महिला भगिनींच्या चेहऱ्यावर दिसत होता. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होत महिलांनी आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन केले. या कार्यक्रमादरम्यान आयोजित स्पर्धेत सोनी साबळे या प्रथम क्रमांक पटकावत मानाच्या पैठणीच्या मानकरी ठरल्या. तसेच, भारती कांबळे यांनी द्वितीय क्रमांक तर भाग्यश्री मेठे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. कार्यक्रमप्रसंगी उपस्थित महिला भगिनींसाठी स्पेशल लकी ड्रॉ देखील काढण्यात आला. यामध्ये वनिता गुडीमनी व लक्ष्मी कसबे या विजेत्या ठरल्या. त्यांना अनुक्रमे सोन्याची नथ व चांदीचा छल्ला बक्षीस देण्यात आले. त्याचबरोबर ऑन द स्पॉट मध्ये देखील सुमारे २५ भगिनींनी बक्षीसे जिंकली. सुप्रसिद्ध निवेदिका पूजा काळभोर यांनी आपल्या सादरीकरणातून रंगत आणली. त्यामुळे उपस्थित महिला भगिनींचा उत्साह वाढला. कार्यक्रमादरम्यान सामाजिक कार्यकर्ते विशाल टिंगरे, सचिन टिंगरे, विनोद पवार, शशिकांत टिंगरे, अतुल टिंगरे, शांताराम खलसे, विनोद वैरागर, अतुल परांडे यांनी उपस्थित राहून मंडळाच्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. मंडळाचे अध्यक्ष योगेश जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष रोकडे, विशाल रेड्डी, सुशील देटे, किरण देटे, गुरुनाथ बिराजदार, पांडुरंग भोसले, विश्वास देटे, हेमंत रेड्डी, आशिष जेकेल्लू, अरुण बिराजदार, लालू दाभाडे, आनंद सकपाळ, मयुर देटे,महेश मुडे, तसेच सर्व सभासद व पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नद्यांचे पश्चिमेकडे जाणारे पाणी पूर्वेकडे वळविणार; जलसंपदामंत्री विखे पाटील यांच्यासोबत आमदार कुल यांची चर्चा

**खोर । प्रतिनिधी**

जल विद्युतनिर्मितीसाठी मुळशी व कोयना प्रकल्पांद्वारे कृष्णा खोर्यातील नैसर्गिकरीत्या पूर्वमुखी नद्यांचे कृत्रिमरीत्या पश्चिमेकडील विपुलतेच्या खोर्यात वळविलेले पाणी पूर्वेकडे तुटीच्या खोर्यात वळविण्याबाबत सुर्वे समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आल्याची माहिती दौंडचे आमदार राहुल कुल यांनी दिली.



आमदार राहुल कुल यांच्या मागणीनुसार राज्याचे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत सुर्वे समितीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. या वेळी सुर्वे समितीचे प्रमुख अविनाश सुर्वे, श्री पानसे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, जलसंपदा प्रकल्प समन्वयक संजय बेलसरे, पुणे पाटबंधारे प्रकल्पाचे मुख्य अभियंता हनुमंत गुणाले यांच्यासह जलसंपदा विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

सुर्वे समितीच्या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, या अहवालावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत बैठक घेऊन पुन्हा सादरीकरण करून अंतिम निर्णय घेण्यात येईल. दौंड तालुक्यातील उजनी धरणाच्या बॅक वॉटर क्षेत्रात नवीन बॅरेज बांधण्यासाठी सुधारित धोरण ठरविण्याची मागणी करण्यात आली. त्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे दौंड, शिरूर, श्रीगोंदा, कर्जत, करमाळा परिसरातील शेतकर्यांना देखील याचा फायदा होणार असल्याने तातडीने कार्यवाही करावी, असे आदेश जलसंपदामंत्री विखे पाटील यांनी दिले.

# राज्यातील सांस्कृतिक कला केंद्रांमध्ये डान्स बार -सुरेखा पुणेकर यांचा थेट दावा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात डान्स बारवर बंदी आहे. त्यानंतर विविध मार्गाने डान्स बार सारखा प्रकार सर्रासपणे सुरु आहे. राज्यातील अनेक संस्कृतिक कला केंद्रामध्ये डान्स बार आणि डीजे सुरु आहे, असा दावा लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी पुण्यात शुक्रवारी केला. पुणे येथे पत्रकार परिषद घेऊन सुरखा पुणेकर यांनी यासंदर्भातील व्हिडिओसुद्धा दाखवला. या व्हिडिओमध्ये सांस्कृतिक कला केंद्रामध्ये सुरू असलेला धिंगाणा दिसत आहे.



डान्स बार राज्यात बंदी असल्याचा दावा केला जात आहे. परंतु सर्रासपणे अनेक संस्कृतिक कला केंद्रामध्ये खुलेआम डान्स बार, डीजे सुरु असल्याचा आरोप लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी केला आहे. सुरेखा पुणेकर म्हणाल्या, राज्यातील ८२ पैकी ४२ कला केंद्रांमध्ये डान्स बार, डीजे सुरु आहे. त्या ठिकाणी काय, काय प्रकार सुरु आहे, त्याचे धक्कादायक व्हिडिओ सुरेखा पुणेकर यांनी दाखवले. राज्यात बेकायदेशीपण सुरु असलेल्या या डान्सबारवर तात्काळ बंदी आणली पाहिजे. या डान्सबारमुळे अनेक संगीतकार, कलाकार, वाजंत्री हे देशोधडीला लागले असल्याचे मत सुरेखा पुणेकर यांनी व्यक्त केले. सुरेखा पुणेकर यांनी दाखवलेल्या व्हिडिओमध्ये साडी नेसलेली महिला डान्स करताना दिसत आहे. त्या महिलेसोबत तरुण अश्लिल चाळे करताना दिसत आहे. सुरेखा पुणेकर यांनी माध्यमांना दिलेला हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# संत मदर तेरेसा पुलावर उभारला आणखी एक रॅम्प

**पिंपरी । प्रतिनिधी**

संत मदर तेरेसा हा ऑटो क्लस्टर ते काळेवाडी दरम्यान उभारला आहे. हा पूल चिंचवडमधून जातो. मात्र चिंचवडकर नागकरिकांना त्याचा काहीच उपयोग होत नव्हता. अखेर या पुलावर जाण्यासाठी रॅम्प उभारण्यात आला आहे. त्यामुळे चिंचवडमधील वाहन चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. लवकरच हा रॅम्प वाहन चालकांसाठी खुला करण्यात येणार आहे.



ऑटो क्लस्टर, चिंचवड ते काळेवाडी दरम्यान संत मदर तेरेसा पूल उभारण्यात आला आहे. हा पुल पिंपरी चिंचवड लिंक रस्त्यावरून जातो. मात्र चिंचवडकरांना त्याचा काहीच उपयोग होत नव्हता. जर या पुलाला जोडण्यासाठी रॅम्प तयार केला तर चिंचवडमधील वाहन चालकांना याचा मोठा उपयोग होऊ शकतो, हे जाणून माजी नगरसेवक राजेंद्र गावडे यांनी रॅम्पबाबत २०१८ मध्ये महापालिकेकडे प्रस्ताव सादर केला. मात्र विकास आराखड्यात येथील जागा नसल्याने येथील जागा मालक श्रीकांत गावडे, उत्तम गावडे, मुकुंद गावडे, राकेश गावडे, राजेश गावडेआणि तोताराम सुखवानी यांना रम्पचे महत्व समजून सागितले. टीडीआरच्या बदल्यात त्यांनी जागा दिल्या.

महापालिकेने १५ कोटी ८९ लाख रुपयांची निविदा मंजूर केली. १७ ऑगस्ट २०२१ रोजी वर्क ऑर्डर दिली. मात्र पाटबंधारे विभागाची एनओसी येण्यासाठी वेळ लागला. सध्या चिंचवडमधून ऑटो क्लस्टरकडे जाणारा रॅम्प तयार झाला आहे. तसेच चिंचवडमधून काळेवाडीकडे जाणार्या रॅम्पचे काम महिनाभरात पूर्ण होणार आहे. त्यानंतर हा रॅम्प वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे.

पिंपरी आणि चिंचवड उड्डाण पुलाला पर्याय

सध्या जुन्या पुणे मुंबई महामार्गावर जाण्यासाठी चिंचवड स्टेशन आणि पिंपरी उड्डाणपूल हे दोन पर्यायआहेत. लवकरच चिंचवड स्टेशन कडून चिंचवड गावाकडे येणारा रेल्वे उड्डाणपूल पाडून नवीन पूल उभारण्यात येणार असल्याचे महापालिकेने जाहीर केले आहे. पिंपरी चिंचवड लिंक रोडवर संत मदर तेरेसा पुलावर उभारण्यात आलेला रॅम्प हा पिंपरी आणि चिंचवड स्टेशन येथील उड्डाण पुलाला पर्याय ठरणार आहे.